सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०१ मे २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक ३० ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

**सूट्टीची सूचना**

०१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त 'सोलापूर तरूण भारत' कार्यालयास सुट्टी असल्यामुळे ०२ मे २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, एजंट, जाहीरातदार यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

## केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय ठरणार मास्टर स्ट्रोक

नवी दिल्ली : एकीकडे चिघळलेल्या पहलगाम हल्ल्यातील पाकड्यांना प्रतिउत्तर देण्यासाठी भारत सज्ज आहे. तर दुसरीकडे आज (दि ३०) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठी घोषणा केली आहे. केंद्रीय रेल्वे तथा देशाचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या विविध निर्णयांची माहिती दिली. भारतात करण्यात येणारी जनगणना जातीनिहाय होणार असल्याची माहिती दिली आहे.



भारत १९४७ साली स्वतंत्र झाल्यानंतर देशात १९५१ साली पहिली जनगणना पार पडली. २०११ साली देशात शेवटची जनगणना पार पडली. ही देशातील १५वी गणना होती. घरांची यादी आणि लोकसंख्या या दोन टप्प्यांवर ही गणना पार पडली होती. मात्र आज (दि ३०) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही निर्णय घेण्यात आले. याची माहिती केंद्रीय रेल्वे तथा देशाचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेत दिली.

अश्विनी वैष्णव काय म्हणाले?

सामाजिक रचनेचा विचार करून आणि संविधानातील स्पष्ट तरतुदी लक्षात घेऊन मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. आज, दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी केंद्र सरकारने पुढील जनगणनेत जातीनिहाय जनगणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. हे सरकार आपल्या समाजाच्या व देशाच्या मूल्यांप्रती व हितसंबंधांप्रती कटीबद्ध आहे. यापूर्वी देखील सरकारने कोणत्याही समाजघटकावर अन्याय न करता, त्यांच्यावर ताण न आणता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के आरक्षण लागू केलं आहे. त्याचप्रमाणे हा निर्णय देखील सर्व समाजघटकांच्या कल्याणासाठी घेण्यात आला आहे.

शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअर मंजुरी

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअर मंजुरी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. मेघालय आणि आसामला जोडणाऱ्या हायस्पीड हायवे असा शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअरला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. हा खूप मोठा प्रोजेक्ट आहे. २२,८६४ कोटी रुपये इतका या प्रोजेक्टचा नियोजित खर्च आहे. उत्तर-पूर्व भारताच्या कनेक्टिविटीसाठी हा महत्त्वाचा प्रकल्प आहे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही ऐतिहासिक तिसरी टर्म आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी देखील आज मोठा निर्णय घेण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा निर्णय घेण्यात आला आहे. ऊसाचे दर केंद्र सरकारकडून ठरवण्यात आले आहेत अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

## लेफ्टनंट जनरल जेपी मॅथ्यू चीफ ऑफ इंटीग्रेटेड डिफेंस स्टाफ पदावरून निवृत्त

नवी दिल्ली, ३० एप्रिल – लेफ्टनंट जनरल जेपी मॅथ्यू हे जवळपास चार दशकांचा सेवाकाळ पूर्ण करून ३० एप्रिल रोजी चीफ ऑफ इंटीग्रेटेड डिफेंस स्टाफ पदावरून (सीआयएससी) निवृत्त झाले. आजच्या निवृत्तीच्या दिवशी, त्यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण केले आणि शहीद वीरांना श्रद्धांजली वाहिली. साउथ ब्लॉक लॉनमध्ये त्यांना तीनही सेनादलांकडून मानवंदना देखील देण्यात आली.



एप्रिल २०२३ पासून ते सीआयएससी पदावर होते, या काळात त्यांनी तिन्ही सेवांमध्ये एकता आणि समन्वय वाढवला. लेफ्टनंट जनरल मॅथ्यू यांनी या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये विश्वासार्ह क्षमता प्राप्त करण्यासाठी संरक्षण सायबर एजन्सी आणि संरक्षण अंतराळ एजन्सीच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाला अनुसरून भारतीय संरक्षण उद्योग आणि शैक्षणिक संस्थांसोबत सहकार्याला प्रोत्साहन दिले. डिफेंस सर्विस स्टाफ कॉलेज ऑफ डिफेन्स मॅनेजमेंट, मिलिटरी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि राष्ट्रीय संरक्षण अकादमीमधील प्रमुख सुधारणांचे नेतृत्व तसेच अभ्यासक्रमाचा आढावा घेण्यापासून ते महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यापर्यंत, त्यांनी सशस्त्र दलांमध्ये विविधता आणि समावेशकता वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शेजारील देशांसोबत संरक्षण सहकार्य कायम राखण्यासाठी आणि प्रादेशिक स्थैर्य आणि सुरक्षिततेला चालना देण्यासाठी, लेफ्टनंट जनरल मॅथ्यू यांनी विविध मंचांवर भारतीय सशस्त्र दलांचे प्रतिनिधित्व केले. तसेच सशस्त्र दलांच्या मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती निवारण क्षमता वाढवण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

डिसेंबर १९८५ मध्ये पंजाब रेजिमेंटमध्ये रुजू झालेले जनरल ऑफिसर ९, जानेवारी २०२२ रोजी रेजिमेंटचे कर्नल बनले. त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना परम विशिष्ट सेवा पदक, उत्तम युद्ध सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक आणि विशिष्ट सेवा पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

## मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी देवेन भारती यांची नियुक्ती

मुंबई: विवेक फणसाळकरांच्या निवृत्तीनंतर देवेन भारती यांच्याकडे मुंबई पोलीस आयुक्तपद देण्यात आलं आहे. ते सध्या मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त आहेत.



विवेक फणसाळकर यांनी ३० जून २०२२ मध्ये मुंबई पोलीस आयुक्तपदाची धुरा स्वीकारली होती, त्यानंतर ते आज ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले. फणसाळकरांच्या निवृत्तीनंतर आयुक्तपदासाठी सदानंद दाते, संजयकुमार वर्मा, रितेश कुमार, महिला पोलीस अधिकारी अर्चना त्यागी यांच्या नावाची चर्चा होती. याशिवाय देवेन भारती यांच्याकडेही या पदाची धुरा दिली जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

देवेन भारती हे बिहारचे रहिवासी आहेत. बिहारमधील दरभंगा येथील रहिवासी असलेल्या भारतीने दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवी प्राप्त केली आहे. देवेन भारती हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू म्हणून ओळखले जातात. सुमारे तीन दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी मुंबई पोलिसात अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत.

देवेन भारती यांनी मुंबईत विशेष पोलीस आयुक्त, संयुक्त पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), आणि अँटी-टेररिझम स्वॉड (-ढड) चे प्रमुख म्हणून काम केले आहे.

देवेन भारती यांचा २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या तपासासह अनेक मोठ्या गुन्ह्यांच्या तपासात समावेश आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे मुंबई पोलीस दलात महत्वपूर्ण बदल अपेक्षित आहे.

विवेक फणसाळकर यांना देण्यात आला गार्ड ऑफ ऑनर

मुंबई पोलिसांच्या परंपरेनुसार,फणसाळकरां यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या दिवशी त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

## भाजपाचे माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांचं निधन

मुंबई : भाजपाचे नेते, विधान परिषदेचे माजी सदस्य, एक उत्तम संघटक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते डॉ. रामदास आंबटकर यांचं आज दुपारी चेन्नईतील महात्मा गांधी मेडिकल मिशन हेल्थकेअर सेंटरमध्ये निधन झाले. गेल्या अनेक दिवसांपासून डॉ. रामदास आंबटकर हे किडनी संबंधित उपचारासाठी एमजीएम हेल्थकेअरला चेन्नई येथे उपचार घेत होते. यामुळे भाजप परिवार आणि शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

डॉ. रामदास भगवान आंबटकर यांचा जन्म १ जुलै १९६० रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील वडनेर या छोट्याशा गावात झाला. लहानपणापासूनच त्यांच्या वडिलांनी सलग तीन वेळा भाजप जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले आणि आयुष्यभर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार आणि शिकवण खोलवर रुजवली. त्यांच्या वडिलांकडून प्रेरणा घेऊन डॉ. रामदास यांनी राष्ट्र उभारणीसाठी आणि लोकांची सेवा करण्यासाठी स्वतःला समर्पित करण्याचा निर्णय घेतला.

शाळेत असतानाच, ते १९६५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले आणि लहानपणापासूनच त्यांचे योगदान देत राहिले. ते १९७९ मध्ये यवतमाळमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे स्वयंसेवक बनले आणि नंतर ते खंबीरपणे काम करत राहिले. ते १९८२ मध्ये अभाविप यवतमाळ शहर सरचिटणीस, १९८४ मध्ये अभाविपचे विस्तारक आणि अभाविपचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले आणि १९८५ मध्ये अमरावती जिल्ह्याचे जिल्हा संघटन सचिव होते. १९८७ मध्ये त्यांना अभाविपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य, विदर्भ प्रदेश संघटन सचिव म्हणून बढती मिळाली आणि विकास कार्यात सहभागी झाले. त्यांनी आपले हायस्कूल पूर्ण केले आणि नंतर १९८५ मध्ये पदवी पूर्ण करून आरटीएम नागपूर विद्यापीठातून बीएएमएसचा अभ्यास करण्यासाठी गेले आणि नंतर १९९२ मध्ये बीए समाजशास्त्राचा अभ्यास केला. ते १९९५ मध्ये आरटीएम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य, २००० मध्ये आरटीएम नागपूर विद्यापीठाच्या स्थायी समितीचे सदस्य झाले, २००५ मध्ये त्यांना आरटीएम नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य बनवण्यात आले.



२००४ मध्ये भारतीय जनता पक्षात (भाजपा) अकोला आणि अमरावती जिल्ह्याचे संघटन सचिव म्हणून सामील झाल्यानंतर त्यांनी राजकारणाचा प्रवास सुरू केला. २००६ मध्ये पश्चिम विदर्भात पक्षाच्या कार्यक्षेत्राचा यशस्वी विस्तार केल्यानंतर, पश्चिम विदर्भातील ३० विधानसभा मतदारसंघांमध्ये भव्य यश मिळविण्यासाठी विविध धोरणे आखली आणि महाराष्ट्रातील सर्वात अनुभवी आणि अनुभवी नेते प्रा. बी.टी.देशमुख यांना अमरावती मतदारसंघात पराभूत करण्यासाठी रणनीती यशस्वीरित्या आखल्या आणि प्रभावीपणे अंमलात आणल्या आणि त्यामुळे डॉ. रणजित पाटील यांचा विजय झाला. २०१५ मध्ये त्यांना भाजप महाराष्ट्राचे सरचिटणीस बनवण्यात आले आणि सध्या ते विधान परिषदेचे सदस्य (एमएलसी) म्हणून वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत आहेत.

## पंजाब सीमेवर अँटी ड्रोन सिस्टिम तैनात करणार

चंदीगड, ३० एप्रिल : पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान सीमेवर वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंजाब सरकारने राज्याला लागून असलेल्या सीमेवर अँटी-ड्रोन सिस्टम तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. पंजाबच्या मुख्यमंत्री कार्यालयाने ही माहिती दिली आहे.

अँटी-ड्रोन सिस्टम तैनात केल्यानंतर, पाकिस्तानकडून येणाऱ्या ड्रोनद्वारे शस्त्रे आणि ड्रग्ज पाठवण्याचा कट अयशस्वी होईल. या तंत्रज्ञानामुळे पोलिस आणि सुरक्षा संस्था पाकिस्तानी ड्रोन तात्काळ शोधून नष्ट करू शकतील. पंजाबच्या मुख्यमंत्री कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, पंजाब सरकार पंजाबला लागून असलेल्या पाकिस्तानी सीमेवर अँटी-ड्रोन सिस्टम तैनात करेल. त्यामुळे पाकिस्तानकडून ड्रोनद्वारे शस्त्रे आणि ड्रग्ज पाठवण्याचा कट अयशस्वी होईल. तसेच ड्रोन पाडण्यासाठी अँटी-ड्रोन सिस्टम तैनात केले जातील. या तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिस आणि सुरक्षा एजन्सी पाकिस्तानी ड्रोनच्या घुसखोरीचा तात्काळ मागोवा घेऊ शकतील आणि नष्ट करू शकतील. दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर, गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेवर सतत शस्त्रसंधीचे उल्लंघन होत आहे. पाकिस्तानी लष्कराने २९ एप्रिलच्या मध्यरात्री जम्मू आणि काश्मीरच्या अनेक सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवरील (एलओसी) त्यांच्या चौक्यांवरून विनाकारण गोळीबार सुरू केला. त्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले.

## विद्यार्थ्यांसाठी गुडन्यूज! राज्यभरातील शाळांची उन्हाळी सुट्टी जाहीर

मुंबई : उन्हाळा सुरु होताच शालेय मुलांना उन्हाळी सुट्टीचे वेध लागते. त्यामुळे परीक्षेनंतर कधी उन्हाळी सुट्टीची घंटा वाजते याकडे सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष लागून असते. याच दरम्यान विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य शिक्षण विभागाकडून (डींरींश एर्वीलरींळेप ऊशरिीींशपीं) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या जाहीर केल्या आहेत.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता, सुसंगती राहण्यासाठी उन्हाळी सुटी, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना सुटी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने उचित निर्णय घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विदर्भ वगळता इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १६ जून रोजी सुरू कराव्यात. जून महिन्यातील विदर्भातील तापमान विचारात घेऊन उन्हाळ्याच्या सुटीनंतर तेथील राज्य मंडळाच्या शाळा २३ ते २८ जून पर्यंत सकाळ सत्रात ७ ते ११.४५ या वेळेत सुरू कराव्यात. सोमवार ३० जून पासून नियमित वेळेत शाळा सुरू करण्यात याव्यात, असे नमूद करण्यात आले आहे. या सूचना सर्व विभागातील विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

गेल्या वर्षी उन्हाळ्याच्या सुटीनंतर राज्यभरातील शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या होत्या, तर विदर्भातील शाळांची पहिली घंटा मात्र १ जुलैला वाजली होती. तसेच गतवर्षी शैक्षणिक सत्र सुरु होत असताना सकाळी लवकर भरणाऱ्या शाळा आता ९ वाजता भरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढू नये, तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विविध निर्णय घेण्यात येतात.

## पुढील तीन दिवस महत्त्वाचे! राज्यभरात वादळी वाऱ्यासह कोसळणार अवकाळी पावसाच्या सरी

पुणे : यंदा मार्चच्या सुरुवातीपासूनच उष्णतेची तीव्रता वाढली आहे. मागील आठवडाभर विदर्भात तापमानाने नवनवे उच्चांक गाठले. तापमानात मोठी वाढ झाल्याने विदर्भासह संपूर्ण राज्यभर तीव्र उन्हाच्या झळा सोसाव्या लागल्या. परंतु आता उष्णतेच्या लाटेची डोकेदुखी सहन केल्यानंतर वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या हजेरीला तोंड द्यावे लागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अनेक भागांत उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसल्यानंतर राज्यात पुन्हा अवकाळी पावसाची हजेरी लागण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

गेल्या आठवड्यात कित्येक ठिकाणी तापमानाचा पारा ४५-४६ अंशांवर गेला होता. त्यानंतर वातावरणात अचानक मोठा बदल झाला आहे. अवकाळीचे ढग दाटण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडू शकतो, असे भाकीत हवामान शास्त्रज्ञांनी केले आहे. यामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पुढील दोन-तीन दिवसांत तापमानात घट होईल आणि राज्याच्या अनेक भागांत अवकाळी पाऊस पडेल, असे हवामान अभ्यासकांचे मत आहे.

सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, नाशिक, पुणे, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांत पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रति क्विंटल ३५५ रुपये रास्त आणि किफायतशीर भाव

### यंदाच्या साखर हंगामासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली, ३० एप्रिल – उस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने २०२५-२६ (ऑक्टोबर - सप्टेंबर) साखर हंगामासाठी उसाचे रास्त आणि किफायतशीर मूल्य (एफआरपी) १०.२५% च्या मूळ पुनर्प्राप्ती दरासाठी ३५५ रुपये प्रति क्विंटल दराने मंजूर केले आहे. यामध्ये १०.२५% पेक्षा जास्त वसुलीत प्रत्येक ०.१% वाढीसाठी ३.४६ रुपये प्रति क्विंटल प्रीमियम आणि वसुलीत प्रत्येक ०.१% घटीसाठी एफआरपी मध्ये ३.४६ रुपये प्रति क्विंटल दराने कपात करण्यात आली आहे.



ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकारने निर्णय घेतला आहे की ज्या साखर कारखान्यांची वसुली ९.५% पेक्षा कमी आहे त्यांच्या बाबतीत कोणतीही कपात केली जाणार नाही. अशा शेतकऱ्यांना २०२५-२६ च्या आगामी साखर हंगामात उसासाठी ३२९.०५ रुपये प्रति क्विंटल मिळतील.

२०२५-२६ च्या साखर हंगामासाठी उसाचा उत्पादन खर्च (ए२ +एफएल) १७३ रुपये प्रति क्विंटल आहे. १०.२५% च्या पुनर्प्राप्ती दराने ३५५ रुपये प्रति क्विंटल एफआरपी हा उत्पादन खर्चापेक्षा १०५.२% अधिक आहे. २०२५-२६ च्या साखर हंगामासाठीचा एफआरपी चालू साखर हंगाम २०२४-२५ पेक्षा ४.४१% जास्त आहे.

मंजूर केलेला एफआरपी २०२५-२६ च्या साखर हंगामात (१ ऑक्टोबर, २०२५ पासून सुरु) साखर कारखान्यांद्वारे शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करण्यासाठी लागू असेल. साखर क्षेत्र हे एक महत्त्वाचे कृषी-आधारित क्षेत्र आहे ज्याचा प्रभाव सुमारे ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले तसेच शेतमजूर आणि वाहतूक यासारख्या विविध सहाय्यक कामांमध्ये काम करणाऱ्यांव्यतिरिक्त साखर कारखान्यांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या सुमारे ५ लाख कामगारांच्या उपजीविकेवर पडतो.

पार्श्वभूमी

कृषी व्यय आणि मूल्य आयोगाच्या शिफारशींच्या आधारे आणि राज्य सरकारे आणि इतर हितधारकांशी सल्लामसलत केल्यानंतर एफआरपी निश्चित करण्यात आला आहे.

मागील साखर हंगाम २०२३-२४ मध्ये, २८.०४.२०२५ पर्यंत शेतकऱ्यांना देय असलेल्या १,११,७८२ कोटी रुपयांपैकी सुमारे १,११,७०३ कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत; अशा प्रकारे, ९९.९२% ऊस थकबाकी देऊन झाली आहे. चालू साखर हंगाम २०२४-२५, मध्ये, २८.०४.२०२५ पर्यंत शेतकऱ्यांना देय असलेल्या ९७,२७० कोटी रुपयांपैकी सुमारे ८५,०९४ कोटी रुपये अदा करण्यात आली असून उसाची ८७% थकबाकी देऊन झाली आहे.

## अक्षय तृतीयेच्या दिवशी वृद्धाची आत्महत्या

जळगाव, ३० एप्रिल : पाचोरा शहरातील मानसिंगका कॉलनीतील एका वृद्धाने आपल्या राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना ३० एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी घडली आहे. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पाचोरा शहरातील मानसिंगका कॉलनीतील रहिवाशी भरत नारायण पाटील (६३) या वृद्धाने आपल्या राहत्या घरात गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविल्याची घटना घडली. सदरचा प्रकार मयत वृद्धाच्या मुलाच्या लक्षात येताच त्याने हंबरडा फोडला. घटनास्थळी पोलिस पथक दाखल होवुन घटनास्थळाचा पंचनामा करून भरत पाटील यांना तात्काळ रुग्णवाहिका चालक किशोर लोहार यांच्या मदतीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. भरत पाटील यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले ? याचा शोध पाचोरा पोलिस घेत आहेत.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा

### महाराष्ट्रदिनी प्रधानमंत्री मोदींची राज्यात उपस्थिती आणि विकासकामांचे उद्घाटन ही आनंदाची बाब

मुंबई, ३० एप्रिल – मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा ६५ वा वर्धापनदिन साजरा करीत असताना, राजधानी मुंबई देशाचं 'ग्रोथइंजिन' तर, महाराष्ट्र सर्वात प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांचं राज्य असल्याचा समस्त महाराष्ट्रवासियांना, महाराष्ट्रप्रेमींना आनंद आहे. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार अशा सर्व क्षेत्रातली महाराष्ट्राची घोडदौड कायम राखताना 'सुसंस्कृत राज्य' ही महाराष्ट्राची ओळख कायम ठेवण्याचा दृढनिश्चय करुया, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापनादिनानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेसाठी त्याग केलेल्या, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात हौतात्म्य पत्करलेल्या, महाराष्ट्रवीरांना अभिवादन केले आहे. महाराष्ट्रवीरांच्या कुटुंबियांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात पुढे म्हणाले की, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी रस्ते, रेल्वे, धरणं, रुग्णालये, शाळा-महाविद्यालये आदी पायाभूत सुविधांची निर्मिती करतानाच, महाराष्ट्राला कला, साहित्य, क्रीडा, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करण्यावर भर दिला होता. त्यांच्यानंतरच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी स्वर्गीय चव्हाण साहेबांचे विचार, कार्य पुढे नेण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला. नागरिकांनीही त्यांच्या प्रयत्नांना एकजुटीने साथ दिली. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी एकजूट होण्याची ही परंपरा कायम ठेवूया, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

यावर्षीच्या महाराष्ट्रदिनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साहेब महाराष्ट्रात येत असून त्यांच्या हस्ते 'वेव्हज परिषदेचं' तसंच इतरही विकासकामांचं उद्घाटन होत आहे, याचा महाराष्ट्रवासीयांना मनापासून आनंद आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे महाराष्ट्राला विकासकामांसाठी मिळणारे सहकार्य आणि सर्व महाराष्ट्रवासीयांची एकजूट, या बळावर आपण महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर पुढे नेण्यासाठी दृढसंकल्प होऊया, असे आवाहन करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या आणि जागतिक कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# बांधिलकीने दिशा प्रतिष्ठानचा वर्धापन दिन उजळला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** सामाजिक बांधिलकीत आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या येथील दिशा प्रतिष्ठानने वर्धापनदिनाच्या औचित्यावर गरजू रुग्णांनासाठी दिशा शस्त्रक्रिया योजनेंतर्गत घेतलेल्या शस्त्रक्रिया योजनेचा ५६ रुग्णांनी लाभ घेतला.

लातूर शहरातील अद्यावत रुग्णालयांत मोफत तसेच अल्प दरात त्या करण्यात आल्या. या बांधिलकीचे सर्वत्र स्वागत व कौतूक होत आहे. माणसे आजारी पडतात अनेकवेळा शस्त्रक्रिया करणे गरजेचे असते. तथापि त्यांचा खर्च अनेकांना पेलावणारा नसल्याने ते आजार अंगावर काढतात. यातून पुढे गुंतागुत वाढते प्रसंगी अनेकांबाबतीत हा विलंब जीवावरही बेतू शकतो.

नेमके हे ओळखून अशा रुग्णांना मदत करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने केला व तो वास्तवातही आणला. यासाठी प्रारंभी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉक्टरांची बैठक बोलवली व आपला मनोदय व्यक्त केला. क्षणाचाही विलंब न करता या डॉक्टरांनी त्यास होकार भरला.

रुग्णांना याची माहिती विविध माध्यमातून देण्यात आली. ५० टक्के सवलतीत तर काही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. तसेच रक्त व क्षकीरण चाचण्यातही अशी सुट देण्यात आली होती. डोळे, नाक, कान घसा, पोट, हाडांचे आजार असलेल्या रुग्णावर सह्याद्री, पोतदार, सदासुख, काळे, सिग्मा , गोरे प्रज्वल व दत्तकृपा हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाल्या. केवळ आर्थिक अडचणीमुळे कोणीही उपचारापासून वंचित राहू नये, सर्वांना चांगले आरोग्य लाभावे, हिच प्रांजळ भावना या संकल्पामागे होती असे प्रतिष्ठाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त...

### आ. अमित देशमुख यांनी केले ॲड. काळे कुटुंबियांचे केले सांत्वन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** लातूर शहरातील ॲड. राजेंद्र दिगंबर काळे यांचे वडील दिगंबरराव काळे यांचे नुकतेच निधन झाले आहे. आ. अमित देशमुख यांनी सोमवारी लातूर शहरातील प्रकाश नगर येथील ॲड. काळे यांच्या निवासस्थानी भेट देऊन



काळे कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन माजी आमदार वैजनाथदादा शिंदे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, व्हाईस चेअरमन विजय देशमुख आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, काळे कुटुंबीय, मित्रपरिवार उपस्थित होते.

### बालविवाहाची माहिती चाईल्ड हेल्प लाईन क्रमांकावर देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** मार्च २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्ह्यात ८० बालविवाह रोखण्यात यश प्राप्त झाले आहे. अक्षय तृतीया हा शुभ मुहूर्त ३० एप्रिल २०२५ रोजी आहे. या दिवशी मोठ्या प्रमाणात सामुदायिक आणि एकल विवाह समारंभांचे आयोजन केले जाते. या कालावधीत बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बालविवाह आयोजित करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे.

अक्षय तृतीया हा महत्त्वाचा शुभ मुहूर्त असल्याने या दिवशी सामुदायिक तसेच एकल विवाह समारंभांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होते. मात्र, अशा समारंभांमध्ये बालविवाह होण्याची शक्यता असते. त्यामुळे अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आयोजित विवाह समारंभांमध्ये बालविवाह रोखण्यासाठी जिल्ह्यातील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी (ग्रामसेवक, बालविकास प्रकल्प अधिकारी), पोलीस यंत्रणा, पाटील, अंगणवाडी सेविका, ग्राम बाल संरक्षण समिती आणि सुजाण नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी. जिल्ह्यात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास किंवा बालविवाह आयोजित होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाइनच्या टोल-फ्री क्रमांक १०९८ वर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### दयानंद महाविद्यालयात निरोप समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** दयानंद इन्टीट्यूट ऑफ फार्मसीमध्ये बी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना औपचारिकपणे सोमवारी निरोप देण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चाऊस वाजिद यांनी केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याविषयी शुभेच्छा देत स्पर्धा परीक्षेचे महत्व सांगून त्यांना प्रोत्साहित केले. आणि जीवनामध्ये यशस्वी होण्याचा मूलमंत्र सांगितला यानंतर तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे पुष्प गुच्छ व भेट वस्तू देऊन भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. अंतिम वर्षातील श्वेता कलानी, अभिषेक ठोंबळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन तृतीय वर्षातील अमृता हाळे, संपदा चार्थनकर, सुप्रिया जोगदंडकर या विद्यार्थिनींनी केले तर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.अविनाश चौधरी यांनी सर्वांचे आभार मानले.

# माहेश्वरी पतसंस्थेत अपहार

## चेअरमन पल्लोड, सचिव मुंदडासह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल - लातूरच्या माहेश्वरी बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कव्हा रोड, लातूर या संस्थेत ८ कोटी १८ लाख ८९ हजार ७०५ रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी पतसंस्थेचे चेअरमन फुलचंद पल्लोड, सचिव प्रेमकिशोर मुंदडा यांच्यासह चौघांविरुध्द गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अपहाराची रक्कम मोठी असल्याने या प्रकरणाचा तपास लातूरच्या आर्थिक गुन्हे प्रगटीकरण विभागाकडे सोपविण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, लातूरच्या माहेश्वरी पतसंस्थेत अपहार झाल्याप्रकरणी शाखाधिकारी व कॅशिअर यांच्या विरोधात पतसंस्थेचे चेअरमन फुलचंद श्रीरंग पल्लोड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या पतसंस्थेचे विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ डी. टी. गायकवाड यांनी ऑडिट केले. या पतसंस्थेत एकूण १८ कोटी १८ लाख ८ हजार ९७० रुपयांचा अपहार झाला आहे, असा अहवाल त्यांनी दिला. विशेष म्हणजे या अहवालात या अपहारप्रकरणी फिर्यादी फुलचंद श्रीरंग पल्लोड यांना जबाबदार धरण्यात आले आहे. या प्रकरणात पूर्वीचा फिर्यादीच आता आरोपी बनला आहे. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात चेअरमन फुलचंद श्रीरंग पल्लोड, सचिव प्रेमकिशोर मथुरादास मुंदडा, शाखाधिकारी भीमाशंकर नीळकंठ पाटील, कॅशिअर सोमनाथ गोरख पंडीत यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून नवीन कलम ३, ४ ची या गुन्ह्यात वाढ करण्यात आली आहे. अपहाराची रक्कम मोठी असल्याने या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे प्रकटीकरणाकडे वर्ग करण्यात आला आहे.

# लातूर पोलीस दलातील सात जणांची महासंचालक सन्मानचिन्हसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** लातूर पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. पोलीस दलातील उल्लेखनिय कामगिरीबद्दल दिला जाणारा मानाचा 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह'साठी लातूर जिल्ह्यातील सात जणांची निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार पोलीस विभागात विविध प्रवर्गात केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल पोलीस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पदक, शौय पदक तसेच पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह, बोधचिन्ह देऊन गौरविले जाते. त्या अनुषंगाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी लातूर जिल्ह्यातील सात पोलीस





अधिकारी व अंमलदारांची सन्मानचिन्ह पदाकसाठी निवड केली आहे. यात अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष मधुकरराव कल्याणकर, पोलीस प्रशिक्षण केंद्रातील राखीव पोलीस निरीक्षक रामदास साहेबराव मिसाळ, जिल्हा विशेष शाखेतील पोलीस उपनिरीक्षक युसूफ इब्राहिम शेख, विवेकानंद चौक ठाण्यातील सहायक पोलीस उपनिरीक्षक विलास संतराम फुलारी, मोटार परिवहन विभागातील कीर्ती मधुकर दोरवे, स्थानिक गुन्हे शाखेतील चालक पोलीस अंमलदार सचिन शेषराव मुंडे आणि पोलीस प्रशिक्षण केंद्रातील गणेश पांडुरंग दळवे यांचा समावेश आहे. पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह पदकासाठी निवड झालेल्या या पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना महाराष्ट्रदिनी १ मे रोजी सदर सन्मानचिन्हचे वितरण करण्यात येणार आहे.

# लातूर येथे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मे पासून कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या १५ डिसेंबर २०२२ च्या अधिसूचनेनुसार, दिव्यांग कल्याण विभाग स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आला आहे.

सध्या जिल्हा स्तरावरील या विभागाचे कामकाज जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यामार्फत हाताळले जाते. तथापि, जिल्हा आणि प्रादेशिक स्तरावरील कार्यालये सुरू करण्यासाठी 'जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी' आणि 'प्रादेशिक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी' ही पदे निर्माण करण्यात आली आहेत.

दिव्यांग कल्याण विभागाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमांतर्गत जिल्हा आणि प्रादेशिक स्तरावरील कार्यालये सुरू करणे समाविष्ट आहे. जिल्हास्तरीय कार्यालये स्वतंत्रपणे सुरू करण्यासाठी, दिव्यांग कल्याण विभागातील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांच्या मूळ पदाचा कार्यभार सांभाळताना 'जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी' या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात १५ एप्रिल २०२५ च्या कार्यालयीन आदेशानुसार सोपवण्यात आला आहे. त्यानुसार, लातूर जिल्ह्यासाठी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद येथील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांना 'जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी' या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. हे कार्यालय १ मे २०२५ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डालडा फॅक्ट्री, लातूर येथील दिव्यांग वित्त विकास महामंडळाच्या कार्यालयात पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. या कार्यालयामार्फत दिव्यांग शाळा संहिता, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या तरतुदींनुसार निर्गमित शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना आणि नियम यांच्याशी संबंधित प्रशासकीय, वित्तीय आणि तद्नुषंगिक अधिकार, जे पूर्वी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे होते, ते आता 'जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी' यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत, असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# जगद्गुरुंच्या हस्ते माजी मंत्र्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** काशी पीठाचे जगद्गुरु परमपूज्य डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते मंगळवारी येथे आयोजित एका कार्यक्रमात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.



जिल्ह्यातील विकासासाठी सहकार, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात दिलीपराव देशमुख यांनी यशस्वी उपक्रम राबवत नागरिकांना स्वावलंबनाचा आधार देण्याचे काम कुठलीही जात, पात, धर्म न बघता सर्वांना सहकार्य केले. या निगर्वी नेतृत्वाला उदंड व निरोगी आयुष्य लाभो, असा आशीर्वाद जगद्गुरुंनी दिला.

यावेळी प्रमुख अतिथी औसा येथील हिरेमठ संस्थानचे शांतीवीरलिंग शिवाचार्य महाराज यांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लिंगायत समाजासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. यावेळी दिलीपराव देशमुख म्हणाले, माझ्या आयुष्यात अनेक संकटे आली. मात्र, महास्वामीजींसारख्या सर्व संतांच्या आशीर्वादाने सर्व संकटावर मात केली.

आजपर्यंत मी ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले त्या क्षेत्रात निरपेक्ष भावनेने काम केले. सर्व जाती धर्माला सोबत घेऊन यापुढील काळातही लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबध्द आहे. आज जगद्गुरु महास्वामीजींच्या हस्ते माझा सत्कार होत आहे, हे माझे परमभाग्य आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी महापौर दीपक सूळ, बालासाहेब बिदादा, उद्योजक हुकूमचंद कलंत्री, सुधीर गोजमगुंडे, लक्ष्मीनारायण कचोळीया, अमोल बचेवार, शिवकुमार गुळंगे, दत्ता शिवणे, आशिष बच्चेवार, धनराज नागलगावे, मन्मथप्पा पंचाक्षरी, बसवंतप्पा भरडे, ॲड. गंगाधरप्पा हामने, भालचंद्रप्पा मानकरी, बाबूराव वडगावे, अशोक पाटील, रमेश सूर्यवंशी, प्रभू हालकुडे आदी उपस्थित होते.

# सेवा हक्क दिनानिमित्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकसेवा हक्क विषयक शपथ घेतली. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उपलब्ध विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या क्यूआर कोड फलकाचे अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोजगार हमी योजना उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकट रावलोड आणि तहसीलदार काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम आणि त्याअंतर्गत अधिसूचित सेवांबाबत तसेच संबंधित तरतुदींची सविस्तर माहिती दिली. तहसीलदार काकडे यांनी आतापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या सेवांचा आढावा सादर केला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याकरिता क्यूआर कोड तयार करण्यात आला आहे. या क्यूआर कोडच्या फलकाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्या हस्ते आज ध्वजवंदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ गुरुवार, १ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होईल.

राष्ट्रध्वज वंदनाचा हा मुख्य शासकीय समारंभ सकाळी ८ वाजता होईल. या समारंभात सर्वांना सहभागी होता यावे, यासाठी इतर कार्यालये किंवा संस्थांनी १ मे रोजी सकाळी ७:१५ ते ९:०० या वेळेत राष्ट्रध्वजवंदन किंवा इतर कोणतेही शासकीय समारंभ आयोजित करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. एखाद्या कार्यालयाला किंवा संस्थेला स्वतंत्रपणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करायचा असल्यास तो सकाळी ७:१५ पूर्वी किंवा सकाळी ९:०० नंतर आयोजित करावा. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कोणत्याही जिल्हा दौऱ्यावर स्वागतासाठी शाल किंवा पुष्पगुच्छ न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, लातूर जिल्हा दौऱ्यावर येताना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांनी भेटीसाठी शाल किंवा पुष्पगुच्छ आणू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# मंदिराच्या कळसाच्या दर्शनानेही फलप्राप्ती

## डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** लोकांना मंदिरात देवाच्या दर्शनासाठी जाण्यास वेळ मिळत नाही. तेव्हा अनेक भक्त मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन जाताना दिसतात. त्यामुळे भाविकांना मंदिराच्या कळसाच्या दर्शनानेही फलप्राप्ती होते, असे प्रतिपादन काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

शहरातील महात्मा गांधी चौकातील श्री महालक्ष्मी मंदिराचा कलशारोहण सोहळा मंगळवारी थाटात पार पडला, त्यावेळी आशीर्वचनात जगद्गुरु बोलत होते. कलशारोहण सोहळ्यानिमित्त भव्य शोभायात्रा, शिवदीक्षा, कीर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य कलशारोहण सोहळा मंगळवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी श्रीशैलम पीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, डॉ. शांतविरलिंग शिवाचार्य महाराज, चंद्रशेखर शिवाचार्य महाराज, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, हिरामणप्पा गवळी, भटू बुध्दाजी नामागवळी, अशोक मंडले, अशोक भाले, देवा अंजीरखाने, नारायण बहिरवाडे, सुरेश शहापूरकर, विजय लकडे, अनिल नायकू, प्रवीण हुंडीवाले, भालचंद्र हुच्चे, रमेश अंबरखाने, विनोद औंढेकर, सदाशिव आलमखाने यांची प्रमुख उपस्थिती होती.



गवळी समाजाचे मन दुधासारखे पांढरे शुभ्र असून ते धार्मिकही असल्याचे नमूद करून डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, आजचे जीवनमान अतिशय धावपळीचे झाले आहे. प्रवासात असताना एखाद्या मंदिरात प्रत्यक्ष दर्शनासाठी जाणे अशक्य होते.

तेव्हा लोक गाडीतूनच मंदिराच्या कळसाचे दर्शन घेताना दिसतात. कळसाच्या दर्शनानेही परमेश्वराच्या दर्शनाची फलप्राप्ती होते. आज मनुष्य मोठ्या प्रमाणात धार्मिकतेकडे वळताना दिसत आहे, ही समाजासाठी महत्वाची बाब आहे. ईश्वराच्या चिंतनाने, दर्शनाने सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण होतात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी श्रीशैलम पीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी मोक्ष ही लक्ष्मीची मूर्ती असल्याचे नमूद केले. सोने, चांदी, तांबे हे सगळे धातू लोह असतात. लोहाला शिखा वाहक म्हणतात. विद्युत शक्ती ही लोहापासूनच बनते. कळस बनविण्याकामी देवाचे आशीर्वादही लागतात. म्हणूनच कळसाला देवही म्हटले जाते. आपण जेव्हा कळसाच्या पाया पडतो, तेव्हा कळस आपला नमस्कार देवाला लवकर पाठविण्याचे काम करत असतो, असेही त्यांनी सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते नूतन कळसाचे विधिवत पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन शिवकांत स्वामी गुरुजी व कुमारस्वामी गणाचार्य यांनी केले. जगद्गुरुंच्या आशीर्वचनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# केंद्रीय लोकसेवा परीक्षेत अक्षय मुंडे यांचे यश; आ. कराड यांनी केला सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० एप्रिल -** लातूर एमआयटीच्या दंत वैद्यकीय महाविद्यालयाचा विद्यार्थी अक्षय संभाजी मुंडे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ६९९ वा रँक प्राप्त करून यश संपादन केल्याबद्दल लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

बालपणीची वडीलाचे छत्र हरवले असताना आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्दीने मेहनत करून गोपीनाथगड पांगरी येथील अक्षय संभाजी मुंडे यांनी अत्यंत बेताच्या परिस्थितीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ६९९ वा रँक प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले. तत्पूर्वी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात लातूर येथील एमआयटीच्या दंत वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. सदरील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील यश संपादन केल्याबद्दल लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी अक्षय मुंडे यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विक्रमकाका शिंदे, वसंतराव डिघोळे, नवनाथ भोसले, रघुनाथ केंद्रे, अभिषेक आकनगिरे, सचिन मुंडे, ॲड. मनोज कराड, प्रमोद घुगे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ॥ उसंतवाणी ॥

१४९६




शिरच्छेद केला । मोदींच्या फोटोचा ।
खेळ विकृतीचा । काँग्रेसींनी ॥१॥

'एक्स'वरती या । टीकेचा ये पूर ।
संतापाचा धूर । धुसमसे ॥२॥

टीकेच्या या ऐसे । बूमरँग झाले ।
डिलीटच केले । घाबरून ॥३॥

आधीच पेटले । सिंधूचे ते पाणी ।
ओठी रडगाणी । पाकड्यांच्या ॥४॥

होता त्यांची कोंडी । आणीबाणी वेळ ।
तेव्हा असा खेळ । कशासाठी? ॥५॥

देशद्रोही का हा । काँग्रेसचा मेंदू ।
टीकेसाठी चेंडू । लूज दिला ॥६॥

कांत म्हणे यांना । तारतम्य नाही ।
विकृतीच वाही । रक्तांतून ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
३० एप्रिल २०२५

## महिला उद्योजकांना 10 लाखांचे गोल्डन ग्रँट्स

मुंबई: ब्रिटानिया मारी गोल्डने हर स्टार्ट-अप सीझन २ ची घोषणा केली आहे. ग्रूपएम मोशन एंटरटेनमेंट आणि माइंडशेअरच्या सहकार्याने सादर होणारा हा पहिलाच राष्ट्रीय रिअलिटी शो आहे ज्यात देशभरातील महिला उद्योजकांना त्यांच्या कल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते. १९ एप्रिल रोजी जिओहॉटस्टारवर प्रीमिअर झालेल्या या शोमध्ये ४० अंतिम स्पर्धक १० लाखांच्या गोल्डन ग्रँटसाठी सहभागी झाल्या आहेत.ग्रूपएम मोशन कंटेंटची संकल्पना असलेला ब्रिटानिया मारी गोल्ड हर स्टार्ट-अप शो म्हणजे फक्त एक सीरिज नाही ते बदलाचे द्योतक आहे, फंडिंगच्या माध्यमातून महिला उद्योजकांना त्यांच्या कल्पनांना परिणाम देण्याची संधी तसेच मेंटॉरशीप आणि राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठातून त्यांना सज्ज करणारा शो आहे.

## सोनी मॅक्स १ वाहिनी लॉन्च

मुंबई - सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया ने सोनी मॅक्स १ वाहिनी लॉन्च करून हिंदी चित्रपट प्रसारण क्षेत्रातील आपली उपस्थिती आणखी व्यापक केली आहे. ही नवी वाहिनी देशभरातील लिनियर टीव्ही प्रेक्षकांसाठी सिनेमॅटिक अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे. 'फिल्मों का ऐसा चस्का, जो देखे हक्का बक्का' असे या ब्रँडचे वचन सोबत घेऊन ही वाहिनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे आणि त्यांचे मनोरंजन करणारे चित्रपट घेऊन आली आहे. सर्व मोठ्या डीटीएच आणि केबल प्लॅटफॉर्म्स वर १ मे २०२५ पासून लाईव्ह होत असलेली सोनी मॅक्स १ ही वाहिनी हिंदी चित्रपट प्रेमींसाठी सर्वात पसंतीची वाहिनी बनण्यास सज्ज आहे.

## डिजिटल साक्षरता कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा

मुंबई - तैवानी तंत्रज्ञान ब्रँड एसुसने विद्याच्या सहकार्याने पश्चिम भारतातील दुर्लक्षित भागातील मुले आणि तरुणांसाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा केली आहे. डिजिटल साक्षरता आणि कौशल्य विकास उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी डिझाइन केलेला हा कार्यक्रम इयत्ता पहिली ते दहावीच्या ६००० हून अधिक विद्यार्थ्यांना तसेच तरुणांना संयुक्त राष्ट्रांच्या डिजिटल साक्षरता फ्रेमवर्कशी जुळवून घेतलेल्या वयानुसार योग्य अभ्यासक्रमाद्वारे परस्परसंवादी आणि प्रकल्प-आधारित शिक्षणाद्वारे आवश्यक कौशल्ये आणि डिजिटल कौशल्ये प्रदान करेल. भागीदारीचा पहिला टप्पा मुंबईत सुरू होईल, त्यानंतर गोवा आणि गुजरातमध्ये. भारतात प्रवेश केल्यापासून, एसुसने देशात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणण्यासाठी वचनबद्धता दर्शविली आहे. विद्यासोबतची भागीदारी ही एसुस इंडियाने भारतातील डिजिटल दरी भरून काढण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## आशी सिंह सोनी सबवरील आगामी 'उफ्फ ... ये लव है मुश्किल' मध्ये

सोनी सब ही वाहिनी नेहमीच आपल्या प्रेक्षकांसाठी नवीन, आकर्षक आणि हृदस्पर्शी मालिका घेऊन येत असते. लवकरच या वाहिनीवर लॉन्च होत असलेली 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' ही मालिका देखील त्याला अपवाद नाही. विनोद, रोमान्स आणि कौटुंबिक नाट्य यांचे मिश्रण असलेली ही मालिका प्रेक्षकांचे लक्ष नक्कीच वेधून घेईल. प्रभावी अभिनय आणि उत्तम स्क्रीन प्रेझेन्सबद्दल ओळखली जाणारी आशी सिंह ही अभिनेत्री या मालिकेत कैरी शर्मा नामक व्यक्तिरेखा साकारणार आहे. कैरी शर्मा एक महत्त्वाकांक्षी आणि होतकरू वकील आहे.

## सिमरन कौरने ऑटोरिक्षा चालवायला शिकली

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जमाई नं.१' मधील एका महत्त्वाच्या भागासाठी प्रेक्षकांना भावनांनी भरलेली दृश्ये पाहायला मिळणार आहेत, कारण रिद्धीच्या भूमिकेतील सिमरन कौर एका हिरॉईक क्टमध्ये दिसून येईल आणि तिला पाहून प्रेक्षक थक्क होतील. नाट्यमय घडामोडींमध्ये रिद्धी जीवनमरणाच्या प्रसंगात सापडेल कारण तिच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका येईल. आजूबाजूला मदत करायला कोणीच नसताना तिला अचानक जवळ एक ऑटोरिक्षा दिसते आणि मग ती क्षणात तिच्या ड्रायव्हरच्या सीटवर बसते आणि त्यांना इस्पितळात घेऊन जाते. यातून तिचे तिच्या परिवारावरील अढळ प्रेम, तिची ताकद आणि निर्धार दिसून येतो.

# बुद्धिबळ स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरचे घवघवीत यश



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - नुकत्याच पुणे येथे पार पडलेल्या खुल्या बुद्धिबल स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. आपली पहिलीच शहराबाहेरील स्पधी खेळणार्या गौरख वैदंडे याने उत्कृष्ट खेळ करत बेस्ट अनरेटेड खेळाडूचे प्रथम पारितोषीक मिळवले. जवळपास साडे तीनशे खेळांडूनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.

मानांकित-बिगर मानांकीत एकापेक्षा एक वरचढ असणार्या खेळाडूमध्ये बाहेरच्या स्पर्धांचा अनुभव नसलेल्या गौरवने नऊ सामन्यापैकी आठ सामन्यात मानांकीत खेळाडूंना झुंज देत आपला ठसा उमटवला. ज्यात बिहार, गुजरात सारख्या राज्यातील खेळाडूंचा समावेश होता. अखेरीस नऊपैकी सहा गुण घेत मानांकीत खेळाडूंच्या यादीत गौरवने आपले नाव कोरले. आई-वडिल यांच्या आशिर्वादान तसेच घरातील सर्व सदस्यांच्या पाठिंब्याने, स्वतःच्या मेहनतीच्या बळावर मिळालेल्या घवघवीत यशाचे कौतुक सर्वत्र होत आहे.

श्री सरस्वती कला विकास केंद्रचे अमित देशमुख सर व शिरीष बक्षी सर यांचे मार्गदर्शन गौरव यास लाभत आहे. तसेच श्री सरस्वती कला विकास केंद्र ॲकॅडमीच्या श्रावणी नानकर व अर्चित बागला यांनीही उत्तम खेळ खेळत अनुक्रमे साडेपाच व चार गुणांची कमाई करत मानांकनात वाढ तसेच मानांकीत खेळांडूच्या यादीत आपले नाव नोंदविले. वरील सर्वांचे हेमेंद्र पटेल, विजय देशपांडे, अमरीश जोशी, चंद्रशेखर कोरची, अजय पटेल, गणेश देशपांडे यांनी अभिनंदन केले.

# भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- भगवान परशुराम जयंतीनिमित्त समाज बांधवांच्या वतीने शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.यावेळी मार्केट कमिटीचे सभापती राजू नाना भुमरे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, दत्ता गोर्डे, सोमनाथ परदेशी, माजी उप नगराध्यक्षा सुचित्रा जोशी, रेखाताई कुलकर्णी,भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष महेश जोशी,नगरसेवक भूषण कावसणकर,विजय चाटुफळे, आप्पासाहेब गायकवाड ,जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष योगेश धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

ही शोभायात्रा प्राचीन गागाभट्ट चौकातून भगवान परशुराम यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा पुढे नाथ समाधी मंदिर, खंडोबा चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक, बसस्थानक चौक, महाराणा प्रताप चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाजी मंडई मार्गे ,सुतार पार मारोतो मंदिर, नवग्रह मंदिर अशी येऊन गावातील नाथ मंदिर याठिकाणी भव्य महा आरती करण्यात आली. यानंतर अमळनेरकर महाराज मठ येथे महाप्रसादाने शोभायात्रेची सांगता करण्यात आली.

जयंती उत्सव समितीचे उपाध्यक्ष -विशाल पोहेकर, यश कुलकर्णी ,सचिव - परीक्षेत गोसावी सचिन काका कावसानकर ,सहसचिव -कैलास देशमुख,सखाराम भागवत

कार्याध्यक्ष संतोष जोशी, रवी मामा जोशी, ओंकार जोशी ,सहकार्याध्यक्ष गणेश कुलकर्णी उत्कर्ष कुलकर्णी ,स्वागत अध्यक्ष डॉक्टर पुष्कर गोसावी कपिल काका कावसानकर ,सह स्वागत अध्यक्ष देवेंद्र शिवपुरी ओंकार दाने ,कोषाध्यक्ष मंदार दादा उज्जैनकर प्रकाश काका टाकळकर ,सह कोषा अध्यक्ष समीर शुक्ल सम्राट वानोळे तेजस आखेगावकर हर्षवर्धन पाटील गणेश देवा साळजोशी प्रशांत देशपांडे सौरभ पोहेकर ऋषिकेश गर्गे ललित महाजन सोनू खिस्ती आदींसह यावेळी ब्राह्मण समाज बांधव ,अखिल भारतीय पेशवा संघटनेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# झाड कोसळून व केबल फॉल्टमुळे काही भागांचा वीजपुरवठा खंडित

## महावितरणने युद्धपातळीवर काम करत केला वीजपुरवठा पूर्ववत



छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण पोलिस कॉलनीजवळ वीजवाहिन्यांवर झाड कोसळून तर सिडको बस स्टँड परिसरात भूमिगत केबल नादुरुस्त झाल्याने शहरातील काही भागांचा वीजपुरवठा बुधवारी (३० एप्रिल) खंडित झाला. महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेऊन वीजपुरवठा पूर्ववत केला.

सिडको बस स्टँड परिसरात ३३ केव्ही वाहिनीच्या भूमिगत केबलमध्ये बिघाड झाला. सकाळी ९ वाजता महावितरणच्या अभियंते-कर्मचाऱ्यांनी धाव घेऊन पर्यायी केबलचे काम सुरू केले. त्यासाठी एन-४ व म्हाडा या ३३ केव्ही वाहिन्यांचा वीजपुरवठा खबरदारीचा उपाय म्हणून सकाळी १० ते दुपारी साडेबारा वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आला. यामुळे एन-४ व म्हाडा उपकेद्रांवरील सुमारे ३० ते ३५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा बंद होता. पर्यायी केबलचे काम करून साडेबारा वाजता वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, कार्यकारी अभियंता महेश पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता दिनेश चावडा, प्रशांत नाखले, सहायक अभियंता विजय काथार, जितेंद्र पन्नाभट्टी, प्रदीप निकम, अक्षय अबदलवार यांनी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी परिश्रम घेतले.

सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास पोलिस कॉलनी एन-१० येथे सुराणानगर व कटकट गेट फिडरवरील कट पॉईंट पोलवर झाड पडल्याने दोन्ही पोल पूर्णपणे वाकून तारा तुटल्या. यामुळे कटकटगेट, एसटी कॉलनी, सुराणानगर, बायजीपुरा परिसरातील साडेपाच हजार ग्राहकांचा विद्युतपुरवठा खंडित झाला. पडलेले झाड बाजूला करण्यासाठी अग्निशमन दलास निरोप देण्यात आला. परंतु त्यांचे झाड कापण्याचे यंत्र बंद पडल्याने त्यांना झाड तोडता आले नाही. त्यानंतर खासगी व्यक्ती बोलावून झाड तोडण्यात आले यामध्ये तीन तास गेले.

झाड तोडल्यानंतर झाडात अडकलेल्या तारा काढून एक पोल उभा तारा जोडण्यात आला. सायंकाळी साडेपाच वाजता वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजीव कोंडगुळी, सहायक अभियंता अभय अरणकल्ले यांच्यासह कर्मचारी व ठेकेदारांनी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी परिश्रम घेतले.

# वेरूळ येथील श्री हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंग मंदिराच्या भुमिपुजन सोहळा आज प.पु. आक्का, महाराज यांच्या हस्ते संपन्न



खुलताबाद प्रतिनिधी - आक्का महाराज नाथ आश्रम वेरूळ, ह भ प विनोद महाराज टोपरे व गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न झाले.

वेरूळ येथील श्री हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंगाची मुर्ती एका चौथऱ्यावर खुल्या जागेत स्थापन केलेली असल्यामुळे लोकांना विनासायास दर्शन होत असे परंतु अनेक भक्तांना तिथे मंदिर असावे असे वाटू लागले.

हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंग मुर्ती म्हणजे शिव आणि विष्णू यांचे एकत्रीकरण झालेलं रुप. वैकुंठ चतुर्दशीला हा रुपदर्शनाचा सोहळा सर्वत्र साजरा केला जातो छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात शिव व विष्णू यांचे मिलन असलेले आगळेवेगळे रुप वेरूळ या ठिकाणी पहावयास मिळते.

अशा या मंदिराच्या भुमिपुजन प.पु. आक्का महाराज नाथ आश्रम वेरूळ, हभप विनोद महाराज टोपरे व गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री प्रशांतजी बंब यांच्या हस्ते संपन्न झाले. या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार प्रशांत बंब म्हणाले कि आज अक्षय तृतीया आहे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे.

धर्म, संस्कृती आणि परंपरेला वंदन करणारा अक्षय्य तृतीयेचा हा पावन दिवस, आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य व यश घेऊन येवो, ही प्रभु श्री पांडुरंगाच्या चरणी मी प्रार्थना करतो अशा शुभेच्छा मतदारसंघातील सर्व नागरिकांना दिल्या. चला,मग या पवित्र दिवशी 'सदैव राष्ट्र प्रथम' हा संकल्प पुन्हा नव्याने जागवूया.

आपण सर्वजण सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मंत्राने प्रेरित होऊन भारतमातेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहूया.

प. पु. साध्वी आक्का महाराज नाथ आश्रम वेरूळ यांनीही यावेळी सर्व भाविक भक्तांना अक्षय तृतीयाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटनप्रसंगी माजी सभापती भिमराव खंडागळे, भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,सरपंच प्रकाश मिसाळ, उपसरपंच विजय राठोड,योगेश टोपरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, सागर मातकर, अनिल करपे, राजेंद्र राठोड, महेंद्र दगडफोडे, युवराज बनसोडे, योगेश काळे, नाना मिसाळ, प्रभाकर थोरात, आमदार बंब यांचे स्विय सहाय्यक गोपाल वर्मा यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# आंतरजातीय विवाह केलेल्या १४० जोडप्यांना अनुदान वितरीत

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका)- आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना समाजकल्याण विभागामार्फत चालविली जाते. जिल्ह्यात असे १४० लाभार्थी जोडपे होते. त्यांना प्रति जोडपे ५० हजार रुपये या प्रमाणे ७० लाख रुपयांचा लाभ वितरीत करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी दिली आहे.

समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेत जिल्ह्यात १४० लाभार्थी पात्र होते. त्यांना लाभ देण्यासाठी ७० लक्ष रुपयांची तरतूद प्राप्त झाली होती. ७२ लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली होती. मात्र ५६ लाभार्थ्यांचे प्रुव्हल दि.३१ मार्च रोजी कालबाह्य झाले होते व १२ लाभार्थ्यांना बँकेकडून प्रुव्हल मिळाले नसल्याने ६८ लाभार्थ्यांच्या लाभाची तरतूद शासनास परत गेली होती.

# शिवपार्क च्या कामाला गती देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा- पर्यटन मंत्री शंभूराज देसाई



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० एप्रिल


तालुक्यातील फर्दापूर येथे उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिवपार्क च्या कामाला गती देवून काम पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा असे निर्देश देत शिवस्मारक उभारण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही राज्याचे पर्यटन मंत्री ना.शंभूराज देसाई यांनी दिली. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे जाण्या येण्यासाठी ई रिक्षासाठी परवानगी देण्यासह परिसरात गावांच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेत मंत्री शंभूराज देसाई यांनी याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड - सोयगाव मतदारसंघातील पर्यटन विभाग अंतर्गत विविध विषयांवर मुंबई येथे ना.शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आ.अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.या बैठकीत जगप्रसिद्ध अजिंठा लेणी सह परिसरातील अजिंठा,फर्दापूर व इतर पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचा विकास करणे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे,तसेच येथे पायाभूत सुविधांची कामे करण्यासंदर्भात आ.अब्दुल सत्तार यांनी पत्र देत मागणी केली. यावर सविस्तर चर्चा बैठकीत करण्यात आली.

या बैठकीस पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पवार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता शैलेंद्र बोरसे,मंत्रालयातील पर्यटन विभागाचे कक्ष अधिकारी डॉ. कदम,डॉ.डी. एन.पाटील,एमटीडीसीच्या वरिष्ठ व्यवस्थापक ( जमीन व मालमत्ता ) श्रीमती क्षिप्रा बोरा यांच्यासह अजिंठा लेणी व्यापारी संघटनेचे पपींद्रसिंग वायटी,सचिव विलास वराडे आदींची उपस्थिती होती.

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरातील विविध गावांत पायाभूत सुविधांची कामे तसेच येथील पुरातन वास्तुंच्या जतन व संवर्धनासाठी कृती आराखडा तयार करून सदरील प्रस्ताव शासनास सादर करावा असे निर्देश मंत्री ना. शंभूराज देसाई यांनी अधिकाऱ्यांना दिले. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे पर्यटकांना शासनाच्या पर्यावरण पूरक बसने ये जा करण्यात येते.त्याच धर्तीवर येथे ई रिक्षासाठी परवानगी देण्यात यावी यातून स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल तसेच पर्यटकांना देखील पर्यायी सुविधा उपलब्ध होईल असे आ.अब्दुल सत्तार म्हणाले.यावर ना.शंभूराज देसाई यांनी सकारात्मक भूमिका घेत याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील रवी मंदिर,जाईचा देव येथे रस्त्यांचा विकास करणे तसेच येथे भक्तनिवास व सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी आमदार अब्दुल सत्तार यांनी पत्राद्वारे केली. त्यासोबतच वेताळवाडी किल्ल्याचा देखील विकास करण्यासाठी निधी द्यावा असे आमदार अब्दुल सत्तार यावेळी म्हणाले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०६) हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व

हिंदू धर्म म्हणजे हिंदुत्व नाही. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे हा संघाचा विचार समजून घेऊया

एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति हा हिंदुत्वाचा आधारभूत सिद्धांत आहे. म्हणजे ईश्वर एकच आहे; परंतु उपासक त्यांना विष्णू, शंकर, लक्ष्मी, सरस्वती, अल्ला, येशु अशा नावाने संबोधतात. याला विरोध असण्याचे कारणच नाही. साऱ्या उपासकांचे हिंदुत्वाची संकल्पना स्वागत करते. असा हिंदुत्वाचा पुरस्कार हा एक प्रकारचा समन्वयाचा विचार आहे. हिंदुत्वाच्या माध्यमातून उत्कट आणि विशुद्ध राष्ट्रभावना जागृत करूया. हिंदुत्वाने आस्तिकांबरोबर नास्तिकांना पण आपले मानले आहे. हिंदुत्व म्हणजे कर्मकांड नाही; ती जीवनदृष्टी आहे. हिंदुत्व हा पाया आहे त्यावर आपण

एकसंघ- सुसंघटित समाज जीवन उभे करू या.

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी जन्मला आहे का? नाही हे प्राचीन राष्ट्र आहे. हे हिंदू राष्ट्र आहे. व येथील सर्व धर्मीयांचा हे हिंदू राष्ट्र सन्मान करते. फक्त सर्वांनी

राष्ट्र सर्व प्रथम या अटीचे पालन करावे. तरच भारत माता विश्वगुरू पदावर आरुढ होईल.

यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकांनी हिंदूधर्म- हिंदुत्व व हिंदू राष्ट्र याचा अर्थ अभ्यासपूर्वक समजून घ्या; अशी कळकळीची विनंती करते.

॥ भारत माता की जय ॥

॥ वंदे मातरम् ॥ क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती



चुडावा ता. पूर्णा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.या वेळी आमदर रत्नाकर गुट्टे मित्रमंडळाचे पूर्णा ता.अध्यक्ष सुभाष देसाई यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष परेश कापुरे उपाध्यक्ष बालाजी ढगे, यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## अक्षय तृतीयेला ग्राहकांचा झुकाव सोनं खरेदीकडे



तभा वृत्तसेवा

गंगापुर, दि ३०

गंगापुर शहरातील बाजारपेठांमध्ये अक्षय तृतीयेनिमित्त सोनं खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शुभ मुहूर्त समजल्या जाणाऱ्या या दिवशी सोनं खरेदी केल्याने संपत्ती आणि समृद्धी वाढते, या पारंपरिक श्रद्धेमुळे सराफा दुकानांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. शहरातील संतोष ज्वेलर्समध्ये तसेच सराफ बाजारात असंख्य ग्राहकांनी सकाळपासूनच विविध सोनं आणि चांदीच्या दुकानांमध्ये ग्राहकांची रीघ लागलेली दिसली. अनेक कुटुंबांनी या दिवशी दागिन्यांची खरेदी करत उत्सव साजरा केला. दरम्यान, जागतिक बाजारात सोन्याच्या किमतीत दरवाढ व तर घसरण झाल्याने काही ग्राहकांना फायदा मिळाल्याचे सराफ व्यावसायिक संतोष अंबीलवादे यांनी सांगितले.

## महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका)- महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर आणि उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता

छत्रपती संभाजीनगर, दि.३० (जिमाका)- शिवराई ता.गंगापूर येथे ऊस तोडणी कामगाराची भाची काजल शरद राठोड ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. पोलिसांत श्रीमती वर्षा अमोल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास जेवण करुन झोपले असता. रात्री १ वाजेच्या सुमारास व सकाळी ४ वाजेच्या ऊसतोडच्या कामासाठी जाण्यासाठी उठलो असता भाची आढळून आली नाही. भाची चा शोध घेतला असता ती मिळून आली नाही, म्हणून तक्रार नोंदविण्यात आली. काजल हिचे वर्णन खालीलप्रमाणे- रंग सावळा केस काळे व लांब, बांधा सडपातळ, उंची ४ फूट, अंगात, लाल रंगाचा पंजाबी ड्रेस व लाल रंगाची पँट, पायात चप्पल नाही, भाषा मराठी, हिंदी, लमाणी भाषा बोलते. अधिक तपास पोलीस हेड कॉनस्टेबल बी.ई.शिंदे करीत आहेत.या बालिकेविषयी अधिक माहिती मिळाल्यास वाळूज पोलिसांत माहिती द्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## वसुधा'च्या सेटवर प्रिया ठाकूर बनली शेफ

असा दिवस रोज रोज येत नाही जेव्हा एखाद्या मालिकेची प्रमुख अभिनेत्री मालिकेच्या सेटवरील किचनमध्ये शिरून सर्वांसाठी जेवण बनवायला घेते. झी टीव्हीवरील 'वसुधा' मालिकेतील वसुधाच्या भूमिकेतील प्रिया ठाकूरने हल्लीच सेटवरील लंच ब्रेकमध्ये हे केले. सर्वांचे मन जिंकून घेत प्रियाने स्वतःहून ह्या मालिकेचे कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रॉडक्शन टीमसाठी आपल्या मालिकेच्या सेटवर लाईव्ह रोटी काऊंटर लावून १०० हून अधिक चपात्या बनवल्या.

## 'तेनाली रामा' मालिकेत दिसणार कुणाल करण कपूर

सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत कृष्ण भारद्वाजने साकारलेल्या तेनाली या दरबारी कवी आणि मुत्सद्दी रणनीतीकर्त्याच्या सुरस रम्य कथा पाहताना प्रेक्षक गुंग झाले आहेत. विनोद, बुद्धीचातुर्य आणि सुजाणता यांचे मिश्रण करून सादर करणारी ही मालिका आता एक नवीन वेधक वळण घेत आहे.

## विमलबाई दुसाने यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० एप्रिल - येथील रहिवाशी विमलबाई कृष्णा दुसाने(वय.७५) यांचे मंगळवार रोजी रात्री ८:३० वा.वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी ११:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.त्या योगेश (पप्पू)दुसाने यांच्या मातोश्री तर विष्णू दुसाने यांच्या काकू होत.

## अग्रलेख...

# लष्कराचे लाड अंगलट!

'असंगाशी संग, प्राणाशी गाठ' अशी एक मराठी म्हण आहे. नको त्या व्यक्तीशी, प्रवृत्तीशी जवळीक साधल्याने प्राणावर बेतू शकते, असा तिचा अर्थ. याच म्हणीच्या आधारे असे म्हणता येते की, पाकिस्तानच्या निर्मितीपासून आतापर्यंतच्या सर्व शासकांना तिथल्या लष्कराशी रोमांस करीत राहण्याचा जो नाद जडला होता, तो अखेर त्याच देशाच्या अंगलट आला आहे. पाकिस्तानी नागरिकांची घाबरगुंडी उडाली आहे हे तर सोडाच; आता पहलगाम हल्ल्याचा सूड भारत घेईलच, या भीतीने तिथल्या लष्करात एकीकडे बंड माजले आहे आणि दुसरीकडे लष्करी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या राजीनाम्याचे सत्रही सुरू झाले आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांचा राजीनामा मागणारे हॅश टॅग्ज समाज माध्यमांवर ट्रेंड होत आहेत आणि पाकिस्तानची मान लाजेने खाली जातेय. भारतासोबत स्वतंत्र झालेले, किंबहुना फाळणीच्या जखमेतून जन्माला आलेले पाकिस्तान नावाचे कथित इस्लामी गणराज्य कधीही शांततेत जगले नाही. एक तर ते भारताशी भांडत राहिले किंवा एकाच धर्माचे लोक असूनही आपसातील उपपंथीय क्लेशात तंडत राहिले. दुसरे म्हणजे सतत लष्करशहांची ढवळाढवळ हे पाकिस्तानचे व्यवच्छेदक लक्षण. जेवढी ऊर्जा पाकिस्तानचे सरकार, तेथील लष्कर आणि जनता यांनी भारतद्वेषात आजवर वाया घालविली, तिचा वापर सकारात्मक पद्धतीने केला असता तर आज गरिबी, उपासमार, रोगराई आणि अशा संकटांचे सावट त्या देशावर राहिले नसते. पण, जन्मापासून पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना लष्करशाहीचा मोह आहे आणि लष्करशहांनादेखील सरकार व लोकव्यवहारात हस्तक्षेप करणे आवडते. लष्करशहांना गोंजारणे तिथल्या सर्व राज्यकर्त्यांना आवडत असते आणि वेळ आल्यावर लष्करशहाच तिथल्या राज्यकर्त्यांना शह देतात, असा इतिहास आहे. जनरल असीम मुनीर हा पाकिस्तानचा असाच नवा लष्करशहा आहे. पहलगामच्या हत्याकांडाचा आदेश मुनीरने दिला होता, असे आता जग म्हणू लागले आहे. पाकिस्तानातही लोकांना व लष्करी कर्मचाऱ्यांना ते पटू लागलेले दिसते. त्याचाच परिणाम म्हणून मुनीरच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्याची परिणती मुनीरच्या राजीनाम्यात होते की पुन्हा एकदा लोकनियुक्त सरकारच धोक्यात येते, हे आता पाहायचे.

पाकिस्तानातील लोकशाही हा फारच मोठा विनोद आहे. तिथे लष्कर म्हणजे समांतर सरकार असते. बहुतेकदा ते कायद्याच्या वर असल्यासारखे वागत असते. भारत किंवा अमेरिकेसारख्या लोकतांत्रिक देशातील सरकार आणि लष्कर यांचे संबंध वेगळ्या पातळीवरचे असतात. लष्कर हे नागरी नेतृत्वाच्या म्हणजे लोकतांत्रिक प्रक्रियेतून नेतेपदी निवडून आलेल्या पंतप्रधान किंवा राष्ट्रपतीच्या अधीन असते. पाकिस्तानात सत्ताधीश कोणत्याही पद्धतीने सत्तेत आलेला असो, वरचष्मा लष्कराचा असतो. पाकिस्तानच्या लष्कराला जाणकार मंडळी 'स्टेट विदिन अ स्टेट' अर्थात पाकिस्तानातील निर्वाचित सरकारच्या बरोबरीने अस्तित्वात असलेले वेगळे सरकार, असे नाव देतात. लष्कराने निर्वाचित सरकार पाडले, निवडणुकांमध्ये फांदेबाजी केली; एवढेच नव्हे तर न्यायपालिकेत ढवळाढवळ केली, हा पाकिस्तानचा इतिहास आहे. स्वातंत्र्याच्या अवघ्या दशकानंतर १९५८ मध्ये, म्हणजे ज्या काळात भारतात लोकशाही बहरायला आणि विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास सुरुवात झाली होती, त्या काळात जनरल अय्यूब खान यांनी पाकिस्तानचे कमकुवत सरकार पाडले आणि लष्करशाही प्रस्थापित केली. १९७७ मध्ये जनरल झिया उल-हक यांनी पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांना षड्यंत्र रचून सत्तेबाहेर केले आणि १९८८ पर्यंत सत्ता उपभोगली. १९९९ मध्ये जनरल परवेज मुशर्रफ यांनी नवाज शरीफ यांचे सरकार उलथविले आणि जवळजवळ दशकभर पाकिस्तानवर राज्य केले. दरम्यानच्या काळात थोडा-थोडा काळ कथित लोकतांत्रिक सत्ताधीशांना मिळाला. परंतु, त्यापैकी बहुतेकांचे स्वरूप हे कुठल्या तरी अदृश्य शक्तींच्या हाती नाचणाऱ्या बाहुल्यांचेच होते. पाकिस्तानमध्ये राजकारणात लष्कराचा हस्तक्षेप आहेच. शिवाय, तो अर्थकारणात आणि माध्यमांमध्येही आहे. भुत्तो असो, नवाज शरीफ असो किंवा इम्रान खान असो, कोणत्याही नेत्याने जरासे स्वतंत्र आणि लोकतांत्रिक व्हायचे ठरविले की, पाकिस्तानी लष्कर काही तरी चाल खेळून त्या नेत्याचा पाडाव करीत असते. तसेच यावेळी घडले काय, हे अद्याप स्पष्ट व्हायचे आहे. कारण शाहबाज शरीफ हे स्वतंत्र प्रज्ञेचे वगैरे नाहीत. मात्र, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामागे जनरल असीम मुनीर यांचा हात असल्याची चर्चा होऊ लागल्याबरोबर प्रथमच त्यांच्या विरोधात असा जाहीर रोष व्यक्त केला जाऊ लागला आहे आणि त्याची दखल सरकारला घ्यावी लागणार आहे. 'फेल्ड स्टेट' अर्थात अपयशी ठरलेले राष्ट्र हा ठपका पाकिस्तानवर आधीचाच. जगात काय चालले आहे, याकडे लक्ष न देता नुसते धर्माच्या किंवा धर्मांध भूमिकेच्या आधारे उभे केलेले एकही राष्ट्र जगात यशस्वी झालेले नाही. पाकिस्तान या नियमाला अपवाद ठरू शकत नाही. प्रचंड बेकारी, जागतिक नाणेनिधीच्या दबक्यात सुरू असलेली अर्थकारणाची वाटचाल हे सगळे पाहून लष्करशहांना चिंता वाटणे स्वाभाविकच. आपली छानछोकी बंद होते की काय, असे त्यांना वाटत असावे. लष्करावर पाकिस्तान अफाट खर्च करतो. तिथल्या लष्करशहांचे केवळ पाकिस्तानात नव्हे तर जगात ठिकठिकाणी प्रासाद आहेत, संपत्ती आहे. पाकिस्तानच्या अर्थकारणाची पडझड जनतेच्या असंतोषाला जन्म देतेय, असे लक्षात आल्याबरोबर पहलगाम हल्ला झाला. त्यामागे जनरल मुनीर यांचे डोके होते, असा जाहीर आरोप झाला आहे.

या घटनाक्रमाच्या अनुषंगाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातला आणखी एक फार मोठा फरक लक्षात आणून दिला पाहिजे. तो असा की, आरंभापासून भारतातील नेत्यांनी राज्यघटनेतील तत्त्वांना महत्त्व दिले आणि त्यायोगे नागरिकांचे हक्क कायम राखले. लोकशाहीवरील मतदारांचे सार्वभौमत्व मान्य करणे हे पर्यायाने लोकशाहीचे खरे रक्षणकर्ते मतदार आहेत, हेच मान्य करणे होय. भारताने ते आजतागायत निगुतीने पाळले. पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी वारंवार लष्कराशी साटेलोटे केले, शरणागती पत्करली किंवा लष्कराने लोकनियुक्त नेत्याला फटके दिले. असे भारतात एकदाही घडले नाही. भारतातील कोणताही पदासीन लष्करी अधिकारी राजकारणावर जाहीर भाष्य करताना दिसत नाही. लष्कराच्या तिन्ही दलांचे प्रमुख हे संरक्षण मंत्र्यांच्या अधीन असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संरक्षणाच्या धोरणावर संसदेचा अंकुश असतो. अमेरिकेतही मुलखी (सिव्हिल) व्यवहाराच्या संदर्भातील लष्कराच्या हस्तक्षेपावर मर्यादा टाकणाऱ्या कायदेशीर तरतुदी आहेत. पाकिस्तानात अशातले काहीही नाही. पाकिस्तानातील सध्याचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सरकार 'शरीफ' तर नाहीच; शिवाय ते सशक्तही नाही. जनरल असीम मुनीर यांच्या इशाऱ्यावर चालणारे सरकार ही या सरकारची आंतरराष्ट्रीय ओळख. ते जनतेला नाराज करू शकते, पण लष्कराची मर्जी कशीही करून सांभाळली जाते. जनरल मुनीर यांची हिंमत वाढली ती त्यामुळेच. त्यांचे हे वर्तन पाकिस्तानच्या समस्या तर वाढवत आहेच. शिवाय, ते एकूण दक्षिण आशियाच्या समस्याही वाढविणारे आहे. आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी दहशतवादी हल्ले घडवल्यामुळे भारत प्रत्युत्तर देऊ शकतो, याचा अंदाज न येण्याइतपत भोळे मुनीर महाशय निश्चितच नाहीत. तरीही त्यांनी ते केले, असा त्यांच्यावर आरोप आहे. यातून पाकिस्तानची जी काही अडचण झाली आहे, ती आहेच तसेच दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचा दोषही पुन्हा एकदा पाकिस्तानच्या माथ्यावर आला आहे. भारताकडून व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी नेटवर्कवर हल्ला केला जाईल, असे संकेत मिळत आहेत. तसे झाले तर त्याची जबाबदारी जनरल मुनीर यांच्यावर असेल. तशीच ती पाकिस्तानच्या सरकारवरही असेल. यापुढच्या काळात पाकिस्तानचे सरकार, जनता आणि लष्करातील सुजाण लोकांनी जनरल मुनीर यांच्यासारख्या लोकांना थारा मिळणार नाही, यासाठी आग्रह धरला तरच काही चांगले निघण्याची शक्यता आहे. फक्त भारताच्या द्वेषापोटी लष्कराशी सुरू असलेला रोमांस तिथल्या सरकारने, जनतेने सुरूच ठेवला तर हे 'फेल्ड स्टेट' एक दिवस अशा स्थितिप्रत येईल की तिथून ते पुन्हा सावरू शकणार नाही.

## विशेष

# देशाला उत्पादक हब बनवण्यास कंपन्या तयार

**प्रा. सुखदेव बखळे**

जगातील अनेक देशांनी चीनमध्ये गुंतवणूक केली होती. या कंपन्या चीनमधून उत्पादन करून जगभर निर्यात करत होत्या; परंतु कोरोनाकाळात चीनवर निर्बंध आले. पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यामुळे उत्पादनासाठी या कंपन्यांनी व्हिएतनामसह अन्य देशांची निवड केली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणेनंतर कंपन्या आता तो देश सोडण्याचा विचार करत आहेत. आणखी कंपन्या भारतात उत्पादन सुरू करण्याचा विचार करत आहेत किंवा त्यांचे उत्पादन वाढवण्याचा विचार करत आहेत. अलिकडेच बातमी आली आहे की 'ॲपल' आता भारतात आयफोननिर्मितीचा विस्तार करण्याच्या विचारात आहे. त्यामागे एक कारण आहे. चीन आणि व्हिएतनामच्या तुलनेत भारतात ट्रम्प शुल्क खूपच कमी आहे. अशा परिस्थितीमध्ये भारत अमेरिकेची मागणी पूर्ण करू शकेल, असे 'ॲपल'ला वाटते. त्याचबरोबर इतर देशांना पुरवठ्यासाठी चीनचा वापर केला जाऊ शकतो. दुसरीकडे, 'गूगल'ची मूळ कंपनी 'अल्फाबेट इंक'देखील याच धोरणावर काम करण्याचा विचार करत आहे. 'गूगल पिक्सेल'ने स्मार्टफोन्सच्या जागतिक उत्पादनाचा काही भाग व्हिएतनाममधून भारतात हस्तांतरित करण्यासाठी तिच्या भारतीय करार निर्मात्या 'डिक्सन टेक्नॉलॉजिज' आणि 'फॉक्सकॉन' यांच्याशी चर्चा केली आहे. हा भाग अमेरिकेची मागणी पूर्ण करेल. सुमारे पंधरवड्यापूर्वी याबाबत चर्चेची पहिली फेरी झाली. हा बदल अल्फाबेटच्या सोर्सिंगला असलेला धोका कमी करण्याच्या धोरणाचा एक भाग आहे कारण अमेरिकेने 'पिक्सेल'चा प्राथमिक उत्पादन आधार असलेल्या व्हिएतनामवर उच्च शुल्क आकारण्याची धमकी दिली आहे.

आता कंपनीने भारतामध्ये एनक्लोजर, चार्जर, फिंगरप्रिंट सेन्सर आणि बॅटरी यासारखे काही घटक स्थानिक पातळीवर तयार करण्यासाठी निर्मात्यांसोबत योजना तयार केल्या आहेत. सध्या भारतात उत्पादित पिक्सेल फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. कोविडमुळे चिनी पुरवठा साखळीत आलेल्या व्यत्ययांमुळे व्हिएतनामला 'चायना प्लस वन' धोरणाचा अधिक फायदा झाला आहे, कारण व्हिएतनाममधून भारतात उत्पादनाचे हस्तांतरण हा एक नवीन ट्रेंड असेल. 'चायना प्लस वन' धोरणाचा सर्वांत मोठा फायदा व्हिएतनामला मिळाला. 'चायना प्लस वन' धोरणांतर्गत चीनबाहेर उत्पादन सुरू करत असलेल्या कंपन्यांमुळे व्हिएतनाम आणि भारताला विशेष फायदा झाला आहे. दोन्ही ठिकाणी कमी कामगार खर्च आणि अनुकूल व्यवसाय वातावरण यासारखे फायदे होतात. व्हिएतनाम गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्यात भारतापेक्षा अधिक यशस्वी ठरला आहे. नीती आयोगाने काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार 'चायना प्लस वन' धोरण स्वीकारण्यात भारताला आतापर्यंत मर्यादित यश मिळाले आहे तर व्हिएतनाम, थायलंड, कंबोडिया आणि मलेशिया हे मोठे लाभार्थी बनले आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले होते की, व्हिएतनामला चीनशी सीमा सामायिक करण्यासारखे काही फायदे मिळाले आहेत.

व्हिएतनाम काही काळापासून चीनचा शेजारी देश असल्याचा लाभ घेत आहे. २० टक्के कॉर्पोरेट कर दर आणि निर्यात-केंद्रित आर्थिक विकास मॉडेलमुळे व्हिएतनाम 'चायना प्लस वन' धोरणाचा एक प्रमुख लाभार्थी म्हणून उदयास आला आहे. दुसरीकडे, केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या प्रयत्नात भारताने विदेशी कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर दर ४० टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर आणला. त्यातच ट्रम्प यांनी व्हिएतनामवर जादा शुल्क लादल्याने संतुलन भारताच्या बाजूने झुकू शकते. अमेरिकेने व्हिएतनामवर ४६ टक्के तर भारतावर २६ टक्के शुल्क लादले आहे. दर ९० दिवसांसाठी रद्द करण्यात आले आहेत; परंतु व्हिएतनाम आणि अमेरिकेने व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. अर्थात भारतापेक्षा व्हिएतनामला ट्रम्पकडून चांगला करार मिळण्याची शक्यता नाही. कारण चीनमधील निर्यात व्हिएतनाममार्गे सुकर केली जात असल्याचा अमेरिकेला संशय आहे. चीन अनेक वस्तू व्हिएतनाममध्ये डम्प करते आणि तिथून अमेरिकेला पाठवल्या जातात. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात व्हिएतनामला चीनवरील शुल्काचा फायदा झाला. तथापि, व्हिएतनामशी अमेरिकेची व्यापार तूट २०१८ च्या पातळीपेक्षा तिप्पट आहे. अमेरिकेचा कर टाळण्यासाठी चीनने व्हिएतनामचा वापर सुरू केल्याचे मानले जाते. व्हिएतनाम हा अमेरिकेला अप्रत्यक्ष साखर निर्यातीचा प्रमुख स्रोतदेखील मानला जातो. 'लोवी इन्स्टिट्यूट' या स्वतंत्र थिंक टँकच्या अलिकडील अहवालात त्याचा उल्लेख आहे. यामध्ये व्हिएतनामी बंदरांमधून चिनी उत्पादनांचा मार्ग बदलून निव्वळ दर चुकवणे समाविष्ट आहे.

अलिकडच्या वर्षांमध्ये अमेरिकेला वाढणारी व्हिएतनामची निर्यात आणि चीनकडून होणारी वाढती आयात यांच्यामधील परस्परसंबंध स्पष्टपणे दिसून येतो. अमेरिकेचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी 'मेड इन व्हिएतनाम' लेबलसह चिनी वस्तू अमेरिकेत पाठवल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अल्फाबेट ही कदाचित एकमेव कंपनी नाही, जी अर्धवट उत्पादन भारतात हलवत आहे. कोरियन इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक सॅमसंगचा व्हिएतनाममध्ये मोठा आधार आहे. इलेक्ट्रॉनिक्सव्यतिरिक्त व्हिएतनाम हा अमेरिकेला पोशाख आणि फुटवेअरचा प्रमुख निर्यातदार आहे. त्यामुळे या प्रदेशांमध्येही भारत उत्पादन बदलांची अपेक्षा करू शकतो. २०२३ मध्ये एकूण पादत्राणे आयातीपैकी अमेरिकेला सुमारे एक तृतीयांश आयात व्हिएतनाममधून आली, असे 'फुटवेअर डिस्ट्रिब्युटर्स अँड रिटेलर्स ऑफ अमेरिका' या उद्योग व्यापार गटाच्या माहितीत म्हटले आहे. 'सीएनबीसी'च्या अहवालानुसार, नायके चीन आणि व्हिएतनाममध्ये सुमारे २५ टक्के फुटवेअर बनवते. फर्निचर उद्योगानेही व्हिएतनामवरील अवलंबित्व वाढवले आहे. २०२३ मध्ये अमेरिकेची फर्निचरची २६.५ टक्के आयात या देशातून आली. सध्या भारतात उत्पादित केल्या जात असलेल्या 'पिक्सेल' फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हिएतनामवर ४६ टक्के तर भारतावर २६ टक्के शुल्क लागू करण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी ९० दिवसांसाठी नवे शुल्क स्थगित केले, तरी दहा टक्के बेसलाईन टॅरिफ कायम आहे. चीनला या ९० दिवसांच्या सवलतीतून वगळण्यात आले असून सर्वाधिक टॅरिफ दराचा सामना करावा लागतो.

सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कराराचा पहिला भाग पूर्ण करण्यासाठी भारताने अमेरिकेसोबत वाटाघाटी वाढवल्या आहेत. त्यांना २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १९० अब्ज डॉलर्सवरून ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवायचा आहे. व्यापार करारामुळे 'अल्फाबेट' आणि 'ॲपल'सारख्या कंपन्यांना अमेरिकेत निर्यात करण्यासाठी भारतात उत्पादन करणे अधिक आकर्षक होईल. 'डिक्सॉन' आणि 'फॉक्सकॉन' फक्त स्थानिक बाजारपेठेसाठी दरमहा ४३ हजार ते ४५ हजार पिक्सेल स्मार्टफोन भारतात बनवत आहेत. 'अल्फाबेट'ला ड्युटी इफेक्ट कमी करायचा होता आणि त्याचे स्मार्टफोन 'ॲपल'च्या 'आयफोन्स' आणि 'सॅमसंग'च्या प्रीमियम गॅलक्सी मॉडेल्सशी स्पर्धा करू शकण्याजोगे बनवायचे होते. भारत स्मार्टफोन्सवर एकूण १६.५ टक्के आयात शुल्क आकारतो. स्वदेशी 'डिक्सन' नवीनतम मॉडेल्ससह भारतात उत्पादित पिक्सेल फोनपैकी सुमारे ६५-७० टक्के उत्पादन करते, तर 'फॉक्सकॉन' जुन्या मॉडेल्सवर अधिक लक्ष केंद्रित करते. 'फॉक्सकॉन'ने गेल्या ऑगस्टमध्ये आपल्या तामिळनाडू युनिटमध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले. 'डिक्सन'ने डिसेंबरमध्ये नोएडा प्लांटमध्ये तैवानच्या कॉम्पल इलेक्ट्रॉनिक्सच्या सहकार्याने 'पिक्सेल' उत्पादन सुरू केले.

भारताशिवाय व्हिएतनाम आणि चीनमध्येही 'पिक्सेल' स्मार्टफोन तयार केले जातात. मात्र मीडिया रिपोर्ट्सनुसार 'गूगल'ने चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी 'फॉक्सकॉन' आणि 'कॉम्पल'च्या माध्यमातून व्हिएतनाममध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले आहे. 'अल्फाबेट' भारतातून अमेरिकेत होणारी निर्यात हळूहळू वाढवेल आणि इतर देशांना पुरवल्या जाणाऱ्या पुरवठ्याचेही मूल्यांकन करेल. भारतीय स्मार्टफोन मार्केटमध्ये 'पिक्सेल'चा वाटा सुपर प्रीमियम किमतीमुळे कमी आहे. गेल्या वर्षी डिव्हाईस ऑफलाईन विकण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यात सुधारणा झाली आहे. एकंदरीत, अनेक कंपन्या आता कर वाचवून निर्यात वाढवण्यासाठी भारताचा विचार करू शकतात.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# भारतीय क्रिकेटचे भविष्यातील 'वैभव'

आमच्याकडे प्रतिभावानांची वानवा नाही. क्षेत्र कुठलेही असो, कुठे ना कुठे या प्रतिभेची चुणूक जाणवते आणि भारताच्या प्रत्येक क्षेत्रात भविष्य हे उज्ज्वलच आहे, याची खात्री देऊन जाते. आमचे क्रीडा क्षेत्र समृद्ध आहे. ते अधिक समृद्ध व्हावे म्हणून होणारे प्रयत्न सर्वश्रुत आहेत. अशावेळी एखादा 'सूर्यवंशी' पुढे येत मी भारतीय खेळाचे भविष्य म्हणून 'छातीठोक'पणे सांगून सर्वांना भुरळ घालून जात असेल तर हे भारतीय क्रिकेटचे 'वैभव'च म्हणावे लागेल.

आज क्रिकेटचे वेड शब्दात वर्णन करण्यापलीकडे आहे. म्हणून तर क्रिकेटवेडी तरुणाई आपल्या क्रिकेटच्या नायकाची एक झलक पाहण्यासाठी जीवाचे रान करते. भारतीय खेळ अनेक आहेत. परंतु त्या क्रिकेटची नशा भल्याभल्यांना वेड लावून जाणारी आहे. भारतीय क्रिकेटचा इतिहास फार जुना आहे. १९२८ मध्ये बीसीसीआयची स्थापना झाली. भारताने पहिला कसोटी सामना २५ जून १९३२ साली खेळला. तेव्हापासून भारतीय क्रिकेटचा आलेख ऊर्ध्व असाच आहे. आज या शृंखलेत अनेक नावाजलेले मोती जोडले जात आहेत. रणजितसिंह भिवाजी जडेजा यांना भारतीय क्रिकेटचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यानंतर आज अनेक दिग्गज भारतीय क्रिकेटला समृद्ध आणि संपन्न करण्यासाठी झटले. लढा अमरसिंग, लाला अमरनाथपासून सुनील गावस्कर, रवी शास्त्री, कपिल देव, चेतन शर्मा, अनिल कुंबळे असो की जवागल श्रीनाथ! अगदी अलिकडच्या काळात क्रिकेटचा देव म्हणून सचिन तेंडुलकरने आपली ओळख निर्माण केली आणि अजूनही या समृद्ध परंपरेचा भाग होण्यासाठी अनेक खेळाडू रांगेत आहेत.



खेळासाठी पोषक आणि सकारात्मक असलेल्या भूमीत आज प्रतिभेची कमी नाही. केवळ अशांना योग्य व्यासपीठ आणि दिशा मिळण्याची गरज आहे. असाच एक प्रतिभावंत सध्या सर्वांच्या मनात घर करून बसला आहे आणि तो म्हणजे वैभव सूर्यवंशी! बिहार राज्यातील ताजपूर येथे २४ मार्च २०११ रोजी जन्मलेला वैभव अवघ्या १४ वर्षे आणि ३२ दिवसांच्या वयातच असंख्य भारतीयांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. सुरू असलेल्या आयपीएलच्या निमित्ताने त्याने स्वतःला सिद्ध केले आणि जागतिक स्तरावरील विक्रमही स्थापन केले. आयपीएलचा अवघा तिसरा सामना खेळताना गुजरात विरुद्ध ३५ चेंडूत १०१ धावांची ऐतिहासिक खेळी करणाऱ्या वैभवने अनेक दिग्गजांना उभे होऊन अभिनंदन करण्यास भाग पाडले. त्याच्या विस्फोटक शैलीने जागतिक स्तरावरही अनेक इतिहास रचले. आयपीएलमध्ये कमी चेंडूत शतक ठोकणारा दुसरा तर एका सामन्यात ११ षटकार मारणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला!

आज आयपीएलच्या निमित्ताने वेगवेगळ्या राज्याचे प्रतिनिधित्व करीत असले, तरीही प्रतिभा भारतीय क्रिकेट संघाचे भविष्य आहे, हे नक्की! ज्या वयात तरुणाई मोबाईल आणि रील्सच्या दुनियेत स्वतःचे समाधान शोधत असते, त्यावेळी वैभव जागतिक दर्जाचे विक्रम स्थापित करीत असेल तर हा त्याचा आत्मविश्वास म्हणजे जागतिक दर्जाचाच म्हणावा लागेल. पदार्पणातच पहिल्या चेंडूवर षटकार मारून त्याने स्वतःचे ध्येय स्पष्ट केले होते. अगदी जे गोलंदाज अन्य संघातील फलंदाजांची दाणादाण उडवून आपले वर्चस्व सिद्ध करतात, अशा गोलंदाजांना लीलया षटकार मारून वैभवने आत्मविश्वास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर अशक्य काहीच नाही, हे सांगण्याचाच प्रयत्न केला आहे.

भारतीय क्रिकेटची गौरवशाली परंपरा आहे. या परंपरेत सचिनपासून सूर्यकुमारपर्यंत अनेक प्रतिभावंतांचा उल्लेख केला जाईल; त्यावेळी वैभव सूर्यवंशी हे नाव घेतल्या वाचून राहणार नाही, हे नक्की! अवघ्या आठव्या वर्गात शिकणाऱ्या वैभवची ही कामगिरी आजच्या फेसबुक, युट्यूब आणि अन्य गोष्टींमध्ये समाधान शोधणाऱ्यांसाठी मोठी शिकवण आहे. जिद्दीच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखविले जाऊ शकते, हेच यातून स्पष्ट होते. अपेक्षा एवढीच असेल भारतीय क्रिकेटचे हे 'वैभव' आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सामन्यांमध्ये आपली सूर्यवंशी खेळी दाखविण्यासाठी सज्ज होईल, तेव्हा त्याला राजकारण किंवा अन्य अडथळ्यांचा गंध लागू नये. भारतीय क्रिकेटचे हे 'वैभव' असेच प्रामाणिकपणे जपले गेले तर हा भारतीय क्रिकेटचा ठेवा वृद्धिंगतच होत राहील.

९७६३७१३४१७


## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# मारुतीरायाचे तोंड दक्षिण दिशेलाच का?

भगवान हनुमान भारतातील एकमेव दैवत आहे की, जे आसेतुहिमाचल पुजिले जाते. भारतात असे एकही गाव नसेल जिथे हनुमंताचे मंदिर नाही. मारुतीचा पार म्हणजे गावाचे संचालन केंद्र. कीर्तन असो की सप्ताह, ग्रामसभा असो पारंपरिक उत्सव मारुतीचा पार हे कार्यक्रम स्थळ निश्चित असते. इतकेच काय, सायंकाळी ज्येष्ठ नागरिकांचा गप्पांचा फडही पारावरच आणि कुटाळ कुचराचे दाणेसुद्धा इथेच ठाण मांडून असतात. पारावरच्या गप्पा तर माहिती केंद्र म्हणून काम करतात. गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्व बातम्या बऱ्याचदा वाढवून चढवून प्रसारित होतात त्या पारावरच. असो. थोडक्यात इतर कोणत्या देवाचे असो वा नसो, पण मारुतीचे मंदिर गावात असतेच. प्रत्येक गावातील हनुमान मंदिर श्रद्धेचे केंद्र आहे. दररोज दिवाबत्ती, शनिवारी शेंदूर, नारळ, गूळ-फुटाणे भाविक वाटतात. एकत्रित मेळा सोबतच बैलपोळा, दसरा, होळी इत्यादी सण-उत्सव साजरे होण्याचे एकमेव स्थान म्हणजे मारुतीचा पार. प्रत्येक हनुमान मंदिराचे एक वैशिष्ट्य सर्वत्र पाहावयास मिळते; ते म्हणजे प्रत्येक हनुमंताचे मुख म्हणजे हनुमान मंदिर दक्षिणाभिमुख असते. मारुतीरायाचे तोंड नेहमी दक्षिण दिशेलाच का असते? हा अनेकांना पडणारा प्रश्न. आज त्यावर चर्चा करू.

आपल्या शास्त्रात दक्षिण दिशा ही यमाची दिशा मानली जाते. यम ही मृत्यूची कारक देवता आहे. यमाचा आदेश अंतिम आदेश असतो. 'मरणं प्रकृती:' हे आपले सूत्र आहे. जन्माला येणारा केव्हातरी मरणारच. त्याची निश्चित वेळ आली की, तो यमाच्या आदेशाने इहलोकीची यात्रा संपवतो. हे काम यमदेव चोख बजावतात. पण अनेकदा अनेकांवर अपमृत्यू ओढवतो. 'अकाल मृत्यू' हा न्यायोचित नसेल तर न्याय कोणाकडे तरी मागितला जातो. हनुमानजी हे शिवाचे अवतार म्हणजे महारुद्र. यमावर सत्ता महाकाळ रुद्राची. हनुमान तर महारुद्र. म्हणून यमाला न्यायोचित वागण्यासाठी नियंत्रक म्हणून



मारुतीराय यमाच्या दिशेला म्हणजे यमाकडे भक्त-कल्याणासाठी लक्ष ठेवून असतात. 'माझे लक्ष आहे!' याची यमधर्माला सतत जाणीव हनुमंत करून देत असतात. आपल्या भक्तांना ते अरिष्टापासून मुक्त करतात. म्हणून तर ते संकटमोचक आहेत. समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे-

**"काळाग्नी काळरुद्राग्नी, देखतां कांपती भयें"**

महामृत्युंजयी हनुमंताचे तोंड दक्षिण दिशेलाच का? याचे हे उत्तर. हा एक भाग झाला. मारुतीरायाचे तोंड सदासर्वत्र दक्षिणेकडे का? याची अजून एक पटणारी कथा आहे. वाल्मीकि रामायणात प्रामुख्याने तीन चिरंजीवांचा संबंध येतो. भगवान परशुराम, भगवान हनुमान आणि महात्मा बिभीषण. हनुमानजी आणि बिभीषणजी दोघेही रामभक्तच. दोघांनीही राम-रावण युद्धात भगवान रामाच्या बाजूने राहून सत्याची साथ दिली, यात शंकाच नाही. पण, कितीही झालं तरी बिभीषण हा रावणाचा भाऊ म्हणजे राक्षस वंशी. रावण वधानंतर श्रीलंकेचे साम्राज्य भगवंताने बिभीषणाला दिले. लंकापती बिभीषण चिरंजीव असल्याने तो श्रीलंकेत चिरकाल कायम निवासी. तो रामभक्त असल्याने भगवान राम असेपर्यंत चिंता नव्हतीच; पण बिभीषण राक्षस कुळातील असल्याने रामावतारानंतर भविष्यात त्याची राक्षसी वृत्ती जागी झाली आणि त्याची वृत्ती फिरली तर तो भविष्यात भारतावर केव्हाही चालून येऊ शकतो. भविष्यातील हा धोका ओळखून त्याला तोडीस तोड देता यावी आणि भारतवर्ष सुखी, शांती आणि भयमुक्त असावे यासाठी चिरंजीव असलेल्या हनुमंताला मुद्दाम चिरंजीव असलेल्या राक्षसवंशी बिभीषणावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी तत्कालीन राज्यधुरिणांनी राज्यशास्त्रीय नियमांना अनुसरून दिली आहे. राजकारणात भल्याभल्यांची नियत फिरू शकते. काहीच स्थिर नसते. आजचा मित्र उद्याचा शत्रू बनू शकतो. म्हणून मित्रराष्ट्र असावेतच; पण त्यांच्यावर अंधविश्वास न ठेवता कूटनीती वापरणे हा खरा राजधर्म होय. हनुमंताचे दक्षिणेकडे तोंड हा राष्ट्रीय सतर्कता आणि सुरक्षेचा भाग होय.

मारुतीरायांचे तोंड दक्षिण दिशेला असण्याचे अजून एक कारण म्हणजे दिशाशास्त्र होय. सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो, हे दिशा ओळखण्याचे मुख्य प्रमाण असले, तरी काही वेळा सूर्याची स्थिती माध्यान्ह समयी अथवा वातावरणातील बदलामुळे लक्षात येणे कठीण. अशावेळी दिशादर्शक म्हणून मारुतीरायाकडे पाहून ही दक्षिण दिशा निश्चित सांगता येते. दिशा भरकटलेल्या अनेकांना त्या काळात हनुमान मंदिर पाहून मार्गस्थ होता येत असे. मारुतीराय तसेही जीवनात मार्गदर्शक आहेत.

थोडक्यात मारुतीरायांचे तोंड सर्व ठिकाणी दक्षिणेकडेच का असते? तर, यमाने न्यायोचित वागावे, राक्षसवंशी चिरंजीव बिभीषणाने दगाफटका करू नये, याचे पूर्वनियोजन हा कूटनीतीचा भाग आणि दिशाशास्त्राची निश्चिती हे या प्रश्नाचे उत्तर आहे. म्हणून मारुतीरायांची मंदिरे दक्षिणाभिमुख असतात.

**"असंख्यात नामे जया देत लोक ।**
**परी नित्य तो सच्चिदानंद एक ॥**
**जयाच्या बळे चालतो हा पसारा ।**
**नमस्कार त्या ब्रह्मतत्त्वा अपारा ॥"**

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### पाणी अडवा पाणी वाचवा

पाणी हा आपल्या जीवनाचा अत्यंत मौल्यवान स्रोत आहे. प्रत्येक माणसाला स्वस्थ आणि सुरक्षित जीवन जगता यावे. पाणी हे जीवनाचा स्रोत आणि मूलभूत गरज आहे. आपल्या शरीरातील दोन तृतीयांश भाग पाण्याचा बनलेला आहे आणि आम्ही दैनंदिन जीवनामध्ये पाण्याचा उपयोग करतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बदलत्या हवामानामुळे पाण्याची टंचाई दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे "पाणी अडवा, पाणी वाचवा" ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. घराच्या छतावरून पाणी संकलन करून भूजल पातळी वाढवता येते. नदी, तलाव आणि विहिरींचे संवर्धन करा, नैसर्गिक जलस्रोत स्वच्छ व संरक्षित ठेवा. बांध, नाले आणि जलसंधारण प्रकल्प उभारणे शेतकऱ्यांनी शेततळी, बंधारे आणि जलसंधारणाच्या पद्धती वापरल्या पाहिजेत. घरगुती पाण्याचा वापर कमी करा, नळ चालू ठेवून पाणी वाया घालवू नका, वापरलेले पाणी गार्डनिंग बागेत किंवा टॉयलेट फ्लशसाठी वापरा, ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करा, अतिरिक्त पाणी वाचवण्यासाठी आणि उपयोग करण्यासाठी आपण निरनिराळ्या पद्धती आणि प्रक्रिया वापरल्या पाहिजेत. भविष्यातील पाणी वाचवण्यासाठी आणि पूरक करण्यासाठी आपण निरनिराळ्या पद्धती आणि प्रक्रिया शोधल्या किंवा विकसित केल्या पाहिजेत. पाणी हा जीवनाचा आधार आहे. ते आपल्या जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. पाण्याचे योग्य वापर आणि संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. पाण्याचा वापर योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पाण्याची किंमत त्याच्या उपलब्धतेपेक्षा जास्त आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखून त्याचा वापर योग्य पद्धतीने करावा.

पाणी वाचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी हा आपला सामूहिक भाग आहे आणि त्याचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखून, त्याचा वापर योग्य पद्धतीने करून, पाण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करूया. आपल्या पृथ्वीवरील जीवनासाठी पाणी हा महत्त्वाचा घटक आहे आणि ते वाचवणे ही आपली सर्वांत मोठी जबाबदारी आहे. औद्योगिक क्षेत्रात कारखान्यांनी पाणी प्रक्रिया करून पुन्हा वापरावे. जर आपण पाणी आडवले आणि वाचवले, तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध राहील. चला, पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखूया आणि जबाबदारीने वागूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

● ● ● ●

### वडेट्टीवारांचा हास्यास्पद प्रश्न

पहलगाम दहशतवादी हल्ला धर्म विचारून करण्यात आला नाही, असे बेताल वक्तव्य काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वडेट्टीवार यांनी केले. जेव्हा की ज्याच्या पती, मुलगा, वडील यांना त्याच्या समोर दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या ते प्रत्यक्षदर्शी तेथे होते. त्यांचे व्हिडीओ पूर्ण जगाने पाहिले तरी वडेट्टीवार म्हणतात की असे कधी होते का? दहशतवाद्यांना एवढा वेळतरी असतो का? त्यांना पटापट गोळीबार करून निघून जायचे असते हे वडेट्टीवार ठामपणे सांगतात. जसे काही त्यांच्यासमोरच दहशतवादी त्यांना सांगून प्लॅन करतात. काहीतरी बोलायचे आणि स्वतःला देशभक्त पुढारी म्हणायचं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे वडेट्टीवारांनी दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांच्या जखमेवर मीठच चोळले आहे. आणि म्हणायचं आमच्या संवेदना त्यांच्या पाठीशी आहे. मी तर एकच म्हणेल वडेट्टीवारजी, आपल्याला मराठी किंवा आपण काय बोलतो हे समजत नसेल तर उगाच टीव्ही किंवा पत्रकारांसमोर मुलाखत देऊ नका आणि आपल्या ज्येष्ठ नेत्यासारखे बूड आणि शेंडा नसल्यासारखे वक्तव्य करू नका. रुचेल ते बोलावे आणि पचेल तेच खावे अशी मराठीत म्हण आहे.

**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

● ● ● ●

### भारताने ठाम भूमिका घ्यावी

२००९ आणि २०१६ मधील काश्मीर आठवला की अंगावर शहारा येतो. त्याच काश्मीरमध्ये आता वातावरण पूर्णतः बदलले आहे. ना दगडफेक, ना भारतविरोधी घोषणा. नागरिक आता सैन्याला आदराने पाहतात आणि सर्वसामान्य काश्मिरी माणूसही दहशतवादाला थारा देत नाही. पहलगाम हल्ला याच बदलाच्या विरोधात केला गेला असे लक्षात येते. पर्यटकांवर हल्ला करून पुन्हा भीतीचं वातावरण निर्माण करणं, रोजगार संपवणं आणि बेरोजगार तरुणांना दहशतवादाच्या मार्गावर ढकलणं हा यामागचा हेतू आहे. विशेष बाब म्हणजे, या वर्षी काश्मीरमध्ये तब्बल तीन कोटी पर्यटक येण्याची नोंद झाली आहे. पर्यटन हे आता काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनत आहे. आणि हीच बाब दहशतवाद्यांना अस्वस्थ करत आहे.

या हल्ल्यात ज्यांनी प्राण गमावले, त्यांना श्रद्धांजली शब्दांत नव्हे, तर कृतीतून व्यक्त व्हावी, अशी आता गरज आहे. इस्रायलने हमासच्या हल्ल्यानंतर जसा निर्णायक कारवाईचा मार्ग घेतला, तशीच ठाम भूमिका भारतानेही घ्यावी, हीच देशवासीयांची भावना आहे.

**अपर्णा जगताप**/८८८८८५१०९१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मयत कर्मचाऱ्यांच्या पत्नींचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

## पालकमंत्री पीडीत विधवा महिलांच्या आंदोलनाची दखल घेतील?




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

वसमत तालुक्यातील आडगावरंजे येथील कर्तव्यावर असलेले तलाठी यांचा खून झाला होता तसेच कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील कृषी पर्यवेक्षक यांचाही कर्तव्यावर असतांना खून झाला. या घटनेनंतर प्रशासन आणि शासनाने मयत कर्मचाऱ्यांच्या पत्नींना आश्वासने दिली परंतु सदरील आश्वासनाची पूर्तता झाली नाही. अखेर या कर्मचाऱ्यांच्या पत्नींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि ३० एप्रिल पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. पीडीत विधवा महिला मागील काही महिन्यांपासून न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. पालकमंत्री या महिलांची दखल घेतील अशी अपेक्षा आहे.

वसमत तालुक्यातील आडगाव रंजे येथील तलाठी संतोष देवराव पवार हे कर्तव्यावर असतांना त्यांचा खून करण्यात आला. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबियावर दु:खाचा डोंगर कोसळला तसेच उपासमारीची वेळ आली आहे. यासंदर्भात पवार कुटुंबाला तत्कालीन जिल्हाधिकारी तसेच महसूल मंत्री यांनी आर्थिक मदतीचे तसेच इतर योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु या घटनेला बराच कालावधी उलटला असून कोणतीही आर्थिक मदत किंवा कुटुंबातील व्यक्तीला शासकीय नोकरी मिळाली नाही. या खून प्रकरणातील आरोपी तसेच त्याचे सहकारी यांनाही अद्याप शिक्षा झाली नाही. पोलिसांना आरोपीच्या सहकाऱ्याचा तपासही अद्याप लागला नाही. या आरोपींना कठोर शिक्षा करून पवार कुटुंबाला आर्थिक मदत तत्काळ मिळावी अशी मागणी संतोष पवार यांच्या पत्नीने केली आहे.

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथे कृषी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले राजेश शिवाजीराव कोल्हाळ यांचा त्यांच्या कार्यालयातच खून करण्यात आला. या घटनेनंतर कोल्हाळ परिवार न्यायाच्या शोधात आहे. परंतु अद्याप या खूनप्रकरणातील आरोपी पोलिसांना सापडला नाही. काही दिवसांपूर्वी पोलिसांनी आरोपीचे छायाचित्र प्रसारीत करून माहीती देणाऱ्यांना बक्षीसही जाहीर केले परंतु आरोपी अद्याप फरारच आहे.

याप्रकरणी कोल्हाळ यांच्या पत्नीने दि २६ जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. यावेळी पालकमंत्री, जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी आरोपीला पकडण्यासाठी पंधरा दिवसांची वेळ मागितली होती परंतु आज दीड महिना उलटला तरीही आरोपी पोलिसांना सापडत नाही. तत्काळ कोल्हाळ यांचा खून करणाऱ्या आरोपीला अटक करावी या मागणीसाठी त्यांच्या पत्नी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसल्या आहेत.

आज पालकमंत्री नरहरी झिरवाळ महाराष्ट्र दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहनासाठी येणार आहेत. या महिलांच्या उपोषणाची ते दखल घेतील का? असा प्रश्न विचारल्या जात आहे. पालकमंत्री सकाळी १० वाजताच नांदेडला रवाना होणार असल्यामुळे त्यांच्या अतिव्यस्त दौऱ्यात या विधवा महिलांचा आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचेल का? अशी शंकाही निर्माण होत आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांचे समावेशन करा

## मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असणाऱ्या जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे १०० टक्के समावेश करा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांचे निवदन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सादर करण्यात आले आहे. मागण्या मान्य न केल्यास दि ७ मे पासून सामुहीक रजा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

आरोग्य विभागात मागील अनेक वर्षापासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अनेक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु तुटपुंजे मानधन तसेच अजूनही त्यांचे समावेशन न केल्यामुळे या कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि १४ मार्च २०२५ नुसार किंवा त्यामध्ये आवश्यक बदल करून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित समावेश करण्याचा कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा, कर्मचाऱ्यांचे मानधन माहे फेब्रुवारी २०२५ पासून आजपर्यंत झाले नाही. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचारी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जात आहेत. याबाबत शासन स्तरावर पाठपूरावा करून तत्काळ वेतन अदा करावे. सदरील मागण्या मान्य न केल्यास सर्व अधिकारी व कर्मचारी दि ७ मे पासून सामुहीक रजेवर जातील असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर शंकर तावडे, श्रीपाद गारूडी, संदीप चिमुटकर, सचिन करेवार, अमोल घुगे, एम एन गाभणे, नितीन दुर्ते, विजय भालेराव, निशांत थोरात, प्रदीप आंधळे, अमोल कुलकर्णी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सेक्रेड हार्ट इंग्रजी शाळेची पुस्तकांची किंमत तीन हजार ते सात हजार पर्यंत, पालकांना फुटला घाम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

येथील सेक्रेड हार्ट इंग्रजी शाळेची पुस्तकांची किंमत ३०३५ रूपयांपासून ते ६९७० रूपयांपर्यंत ठेवण्यात आली आहे. शाळा प्रशासनाने नुकतीच यासंदर्भात पालकांना माहीती दिली असून वर्गनिहाय ही पुस्तके शाळेतूनच मिळणार असल्यामुळे पालकांना चांगलाच घाम फुटला आहे. केवळ पुस्तकांची किंमत एवढी असेल तर विद्यार्थ्यांचा गणवेश, शुज आणि वार्षिक शुल्क किती असेल याचा विचार करण्याची वेळ आली आहे. शिक्षण विभाग मात्र यावर काही निर्बंध घालेल का असा सवाल पालकांमधून विचारल्या जात आहे.

सध्या सगळीकडे इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. प्रत्येक भागात इंग्रजी शाळा उभारून पालकांकडून अव्वाच्यासव्वा शुल्क आकारल्या जात आहे. पालकांचा इंग्रजी शाळांकडे ओढा असल्याचा गैरफायदा घेत या शाळा मनमानी शुल्क आकारत आहेत. तसेच शाळेतून पुस्तके, गणवेश, शुज आदी साहीत्य खरेदी करण्यासाठी वेगळे पैसे आकारत असतांना दिसत आहेत. सर्वसामान्य पालकांना या शाळेत मुलांना शिक्षण देणे परवडत नाही. परंतु इंग्रजी शाळेचे फॅड डोक्यात असल्यामुळे काही पालक मुलांना कर्ज काढून या शाळेत शिकवत असल्याचे दिसत आहे.



पालकांच्या मानसिकतेचा गैरफायदा घेत इंग्रजी शाळांनी सन २०२५-२६ या वर्षासाठी आता वार्षिक शुल्क आणि साहीत्य खरेदीचे रेट कार्ड तयार केले असून पालकांना ते घेणे बंधनकारक केले आहे. दिल्ली सरकारने नुकताच खाजगी अनुदानीत व विनाअनुदानीत शाळांवर शुल्क आकारणी बाबत कायदा काढून त्याची अंमलबजावणी केली आहे. असाच कायदा महाराष्ट्र सरकारने काढावा आणि अशा अव्वाच्यासव्वा शुल्क आकारणाऱ्या शाळांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पालकांमधून होत आहे.

शहरातील ख्रिश्चन मिशनरीची सेक्रेड हार्ट इंग्लीश स्कुलने सन २०२५-२६ या वर्षासाठी विद्यार्थ्यांना वर्गनिहाय पुस्तके शाळेतूनच उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असून इयत्ता ४ थीची पुस्तकांची किंमत ४५९० रूपये, इयत्ता पाचवीची पुस्तके ५७४५ रूपये, इयत्ता सहावीची पुस्तके ६७७० रूपये, इयत्ता सातवीची पुस्तके ६९७० रूपये, इयत्ता आठवीची पुस्तके ६५३० रूपये तर नववीची पुस्तकांची किंमत ३०३५ रूपये आकारली आहे. याशिवाय गणवेश आणि शुज व इतर साहीत्य आणि वार्षिक शुल्क वेगळे द्यावे लागणार आहे.

शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता जिल्हा परिषद, खाजगी अनुदानीत शाळांमध्ये सीबीएससी शिक्षण सुरू केले आहे. या शाळांची गुणवत्ताही आता सुधारत आहे. त्यामुळे पालकांनीही इंग्रजी शाळांचा दुराग्रह सोडून पाल्यांना अशा चांगल्या आणि दर्जेदार शाळांमध्ये दाखल केल्यास त्यांच्या पाल्यांना इंग्रजी शाळांपेक्षाही चांगले शिक्षण मिळणार आहे. शिक्षण विभागाने इंग्रजी शाळांच्या शुल्क आकारणीवर चापही लावणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचा हिंगोली दौरा

हिंगोली- राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ दि. ०१ मे, २०२५ रोजी हिंगोली दौऱ्यावर येत आहेत. पालकमंत्री झिरवाळ हे बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी रात्री १० वाजता मौजे नागेवाडी ता.जि.जालना येथून हिंगोलीकडे प्रयाण करतील व रात्री २ वाजता हिंगोली शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. गुरुवार, दि. ०१ मे रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथून पोलीस कवायत मैदानाकडे प्रयाण करतील. सकाळी ७.४५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे आगमन व महाराष्ट्र दिन समारंभ कार्यक्रमास उपस्थिती राहतील. सकाळी ९ वाजता पोलीस कवायत मैदान हिंगोली येथून शासकीय विश्रामगृह हिंगोलीकडे रवाना व राखीव.

### संकट मोचन मंदिरात परशुराम जयंती



हिंगोली- येथीलसंकट मोचन हनुमान मंदिर येथे भगवान श्री परशुरामजी जन्मोत्सव साजरा करण्यात आले.यावेळ मंदिरचे व्यवस्थापक अनिल खांडल यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करून आरती करण्यात आली. यावेळी अनिल खांडल, अशोक शर्मा, अनिल शर्मा, धीरज शर्मा, राजू उपाध्याय, रजनीश पुरोहित, संजय मानका, जुगल खंडेलवाल, राघव खंडेलवाल, रामदेव खांडल, शुभम खांडल, वासुदेव जोशी, सागर चौधरी, संतोष अवचार, मुंजाजी कुटे, दिलीप शर्मा, श्याम खंडेलवाल, मनोज शर्मा, आशीष शर्मा, पुजा खांडल, प्रभावती खांडल, राजवीर शुक्ला, लक्की जोशी, सत्यनारायण जोशी, पुरण शर्मा, निर्मला खांडल, नेहा पिल्ले, दिनेश चौबे आदींची उपस्थिती होती.

### मारवाडी गल्लीत परशुराम जयंती साजरी



हिंगोली- शहरातील मारवाडी गल्ली येथे ज्येष्ठ व्यक्ती श्री सुभाषजी शर्मा यांचा हस्ते प्रतिमेचे पूजन, पुष्पमाला अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी कपिल शर्मा, सूरज व्यास, प्रयाग शर्मा, सोनू शर्मा, चिरायू शर्मा, रिद्धी शर्मा, सिद्धी शर्मा, अभिषेक शर्मा, धनश्री जोशी, कुंजन जोशी, संकृती तिवारी, नरेंद्र जोशी आदी उपस्थित होते.

# हिंगोलीत भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**



शहरातील गायत्री मंगल कार्यालयात ३० मे रोजी भगवान परशुराम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली त्या निमित्ताने महाआरतीला सकल ब्राह्मण समाजातील अनेकांची उपस्थिती होती.

भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव निमित्त महाआरतीला अशोक शर्मा, जुगल खंडेलवाल, संजय मानका, गोपाल दुबे, संतोष शर्मा, राजू शर्मा, प्रदीप उपाध्याय, प्रकाश शर्मा, दिनेश चौबे, अनिल खांडल, दिलीप शर्मा, शाम खंडेलवाल, केशव दुबे, महेश मोकाटे, पूरण शर्मा, आनंदकुमार शर्मा, गणेश पहिनकर, कैलाश शर्मा, नीलेश खांडल, दीपक शर्मा, बसोले, संजय मेथेकर, रोहित कुलकर्णी, आशीष शर्मा, राघव खंडेलवाल, योगेश पांडे, सुधीर गोगटे, गोविंद शर्मा, साईं शर्मा,प्रेम शर्मा,हर्ष शर्मा, उल्हास दिवाळकर, श्रीकांत बसोले, पुरुषोत्तम पांडे याच्यांसह सकल ब्राह्मण समाजातील अनेकांची उपस्थिती होती. यावेळी राजू शुक्ल यांनी विधिवत पूजा सांगितली. कार्यक्रमात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आ. तान्हाजी मुटकुळे यांचेहस्ते भगवान परशुराम उद्यानाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**



येथील एनटीसी भागात भगवान परशुराम यांच्या जयंतीचे औचित्य साधून आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते येथील ओपन स्पेसमध्ये भगवान परशुराम उद्यानाचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी आ. मुटकुळे यांनी या उद्यानात भगवान परशुराम यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाची मदत घेणार असून या उद्यानाच्या विकासाठी नगर परिषद, तसेच आमदार निधीतून निधी दिला जाणार असल्याचे सांगितले. यावेळी भगवान परशुराम जयंती निमित्त परशुरामाच्या प्रतिमेस आ. मुटकुळे यांनी पुष्पहार अर्पण केला तसेच प्रतिमेचे पूजन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी सर्व समाजासाठी एनटीसीमध्ये ओपन स्पेस दिले होते. त्यांनी ते विकसितही केले परंतु ब्राम्हण समाजाच्या या ओपन स्पेसवर काहीजणांचा डोळा होता. परंतु आम्ही असे होऊ दिले नाही. या ओपन स्पेसचा विकास करून येथे सुसज्ज असे उद्यान उभारण्यात यावे अशी मागणीही यावेळी समाज बांधवांनी केली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, दुर्गादास साकळे, मनोज शर्मा, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, केशव दुबे, सुधीर गोगटे, राकेश भट्ट, राघव खंडेलवाल, उपाध्याय, शाम खंडेलवाल, गोविंद खंडेलवाल, गोपाल दुबे, उल्हास दिवाळकर, संजय मेथेकर आदींची उपस्थिती होती.

# बालविवाह मुक्त हिंगोलीसाठी सहकार्य करा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

बालविवाह मुक्त हिंगोली जिल्हा होण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून मंगल कार्यालयामध्ये व विविध धार्मिक स्थळी बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय विवाह करता येत नाही असा नियम आहे.

विवाह इच्छुक मंडळी विवाह योग्य ठिकाण म्हणून मंगल कार्यालयात किंवा धार्मिक स्थळी नोंदणी करून विवाहाचे आयोजन करीत असतात. पण काही मंगल कार्यालयांमध्ये व धार्मिक स्थळी १८ वर्षाच्या आतील मुलीचा व २१ वर्षाच्या आतील मुलांचा बालविवाह होत असल्याचे निदर्शनास येत आहे. आपल्या मंगल कार्यालयात नोंदणी करताना बऱ्याच वेळा वर, वधु पक्ष मुला-मुलीचे आधार कार्ड देवून नोंदणी करतात. परंतु आधार कार्ड व प्रवेश निर्गम वरील जन्म तारीख यामध्ये बऱ्याच वेळा तफावत आढळून येते. त्यामुळे आधार कार्ड ग्राह्य न धरता संबधिताचा जन्माचा दाखला अथवा शालेय कागदपत्रे (निर्गम उतारा/शाळा सोडल्याचा दाखला) पाहूनच पडताळणी करावी.

मंगल कार्यालयात व धार्मिक स्थळी मुला-मुलींचे विवाह होत असताना मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाले आहे का व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण झाले आहे काय? याची पडताळणी करावी तसेच यासंबधी सूचनेचा माहिती फलक मंगल कार्यालयाच्या धार्मिक स्थळाच्या दर्शनी भागावर लावण्यात यावा व कायदेशीर विवाहाचे वय पूर्ण असल्यास विवाहाची नोंद करून मंगल कार्यालय, धार्मिक स्थळे याकामी उपलब्ध करून द्यावे अन्यथा नाकारावे.अशा परिस्थितीत बालविवाह झाल्यास, संबंधित वर व वधू यांचे आई-वडील किवा पालक व अन्य नातेवाईक मित्र परिवार, विवाह विधी पार पाडणारे संबंधीत व्यक्ती, धार्मिक गुरु, पंडित, काजो, सेवा देणारे, मंडप मालक, फोटो ग्राफर, केटरिंग व्यावसायिक, लॉन्स मालक आणि वाजंत्री असे सर्व, ज्यांनी हा बालविवाह घडविण्यास प्रत्यक्षात मदत केली किंवा तो रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत व जे अशा विवाहात सामील झालेल्या सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो. सोबतच जर ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर सुध्दा गुन्हा दाखल होऊ शकतो.

यामध्ये प्रशासनाला आपला सहभाग अत्यंत महत्वाचा असून बालविवाह विधीपूर्वक लावण्यासाठी चालना, परवानगी, प्रोत्साहन व समर्थन न देता सदर अधिनियमाची अंमलबजावणी व्हावी या दृष्टीकोनातून कृपया प्रशासनाला सहकार्य करावे व मुलींच्या सक्षमीकरणासाठी व प्रगतीसाठी जिल्ह्यात ३९;बेटी बचाओ, बेटी पढाओ३९; ही संकल्पना रुजवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यानी केले आहे.

# देवडा नगरात भगवान परशुराम जयंती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

शहरातील देवडा नगर भागात भगवान श्री परशुरामजी जन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.या वेळी देवडा नगर येथील ॲड विनोद दायमा यांचा हस्ते प्रतिमे ची पूजा, पुष्पमाला अर्पण, दिप प्रज्वलन करून आरती करण्यात आली यावेळी देवडा नगरातील समाज बांधव उपस्थित होते. ॲड विनोद कुमार दायमा, आनंद दायमा, दीपक दायमा, पंकज जोशी, प्रदीप देशपांडे, दिलीप देशपांडे, अभिजीत दायमा, व्यंकटेश दायमा, विशाल दायमा, निर्मला दायमा, माया दायमा, सुनिता दायमा आदींची उपस्थिती होती.

CMYK

धाराशिव •
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रतापराव ताकमोघे यांचे अल्पशा आजाराने निधन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० एप्रिल -**

तुळजापूर शहरातील ज्येष्ठ नागरिक व पत्रकार सचिन ताकमोघे यांचे वडील प्रतापराव ताकमोघे यांचे अल्पशा आजाराने आज (मंगळवार) सकाळी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७५ वर्षांचे होते.

त्यांचे निधन ही तुळजापूरातील सामाजिक क्षेत्रासाठी मोठी हानी आहे.

प्रतापराव ताकमोघे हे अत्यंत शांत, मनमिळावू व धार्मिक वृत्तीचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या सहवासात अनेकांनी प्रेरणा घेतली. समाजातील विविध उपक्रमांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग असे. त्यांच्या जाण्याने एक अनुभवसंपन्न व सुसंस्कृत व्यक्ती हरपली आहे.



त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार सचिन ताकमोघे यांचे ते वडील होत.

प्रतापराव ताकमोघे यांच्या पार्थिवावर आज (दि.३०) दुपारी २ वाजता मोतीजरा स्मशानभूमी, अपसिंग रोड येथे अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### तीन मुलींची विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल संघात निवड

**नळदुर्ग, दि.३० एप्रिल -**

नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मानसी राजेंद्र राठोड, सुप्रिया विनोद राठोड, वैष्णवी मोतीराम राठोड या तीन मुलींची विक्रमासिंहपुरी विद्यापीठ नेल्लोर (आंध्रप्रदेश) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर संस्थेचे सर्व संचालक मंडळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, नॅक समन्वयक डॉ. शिवाजी घोडके, वनस्पती विभाग प्रमुख डॉ. विजय सावंत, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. मोतीराम पवार कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील, प्रा.डॉ. दिपक जगदाळे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. या खेळाडु विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक डॉ. कपिल सोनटक्के, डॉ. अशोक कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

#### सोनारी येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**परंडा, दि.३० एप्रिल -**



सोनारी येथे महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आदिनाथ गुळमिरे, शांतीलिंग गाढवे, रविंद्र गुळमिरे, भाऊसाहेब गुळमिरे, बाळासाहेब गुळमिरे, सचिन गाढवे, सागर गुळमिरे, अमर गाढवे, प्रविण गुळमिरे, सागर गाढवे, स्वप्निल गुळमिरे, संतोष गाढवे, शुभम गुळमिरे, दिलीप गुळमिरे, रामेश्वर कुंभार, हणमंत गाढवे, फंटोष गुळमिरे, आकाश तोडकरी, शिवाजी कारकर उपस्थित होते.



#### नळदुर्गमध्ये भगवान परशुराम जयंती साजरी

**नळदुर्ग, दि.३० एप्रिल -**

नळदुर्ग ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान परशुराम यांची जयंती साजरी करण्यात आली. भगवान विष्णूचे सहावे अवतार भगवान परशुराम यांची जयंती नळदुर्ग येथे ब्राह्मण समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रारंभी वसंतराव अहंकारी व उत्तमराव रामदासी यांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी, सचिव मुकुंद नाईक उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्य, सुहास पुराणिक, उमेश नाईक, सदानंद नाईक, राजकुमार वैद्य, प्रमोद कुलकर्णी, संतोष नाईक, सन्नी भुमकर, अजय देशपांडे, सौरभ रामदासी, गजानन कुलकर्णी, आशुतोष नाईक, प्रसन्ना कुलकर्णी, मयुर जोशी, सारंग जोशी यांच्यासह ब्राह्मण समाज बांधव उपस्थित होते.

# पाणी शाश्वत टिकण्यासाठी जापून वापर करा






### पालकमंत्री प्रतापराव सननाईक यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

पाण्याचा अपव्यय टाळा आणि त्याचा जपून वापर करा, कारण पाणी ही नैसर्गिक देणगी असून ती शाश्वत टिकवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सननाईक यांनी आज दि.३० एप्रिल रोजी केले.



जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जलव्यस्थापन कृती पंधरवडा समारोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मित्रचे उपाध्यक्ष आ.राणाजगजितसिंह पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास घाडगे-पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, पोलिस अधिक्षक संजय जाधव, जलसंधारण विभागाचे अधिक्षक अभियंता विजयकुमार थोरात, कार्यकारी अभियंता दिनेश खट्टे, अमोल मदने, प्रविण चावरे, जलसंधारण विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील बोरी, मांजरा, तेरणा, बेनीतुरा, सिना नद्यांच्या पाण्याचे पुजन करण्यात आले. तसेच तुळशीचेही पुजन करण्यात आले. पालकमंत्री सननाईक म्हणाले की, जलसंपत्तीचे व्यवस्थापन आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि हवामान बदल यामुळे पाण्याची टंचाई दिवसेंदिवस गरज वाढत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने आणि विवेकी वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि स्वयंसेवी संस्थांना पाणी बचतीबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले. पावसाळ्याच्या आधी जलसाठ्यांची साफसफाई, नद्या-नाल्यांचे खोलीकरण आणि जलकुंभांची निर्मिती ही कामे करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पाण्याच्या साठवणुकीसाठी तांत्रिक उपाय, पुनर्भरण विहिरींची निर्मिती, जलशुद्धीकरण यंत्रणा आणि जलपुनर्वापर या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. काही गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु करण्यात आले असल्याची यावेळी ते म्हणाले. फक्त सरकारी योजनांवर अवलंबून राहून चालणार नाही. जनतेच्या सहभागाशिवाय पाणी संवर्धन शक्य नाही. त्यामुळे गावोगाव जलदूत तयार करा, शालेय विद्यार्थ्यांमध्ये पाणी संवर्धनाची बीजे रोवून त्यांना या चळवळीत सामील करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामे होत आहेत. कृष्णा मराठवाडा योजनेतून जिल्ह्यात ऑगस्टपर्यंत घटणी बॅरेजमधून पाणी लिफ्ट करण्यासाठी काम वेगाने सुरु आहे. तसेच जिल्ह्यात तामलवाडी, वडगाव सि., कळंब, तेरखेडा येथे छोट्या एमआयडीसी उभा करण्याचे कामही सुरु आहे. तुळजाभवानी मातेचे मंदिर आणि परिसराताचा विकास करण्याचा आराखडा तयार करण्यात आला असून जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटीबध्द असलयाचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले की, शेतकऱ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळावा. तसेच शेतकऱ्यांनी योग्य वापर करावा असे शासनाकडून सांगण्यात येते. त्याला शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळतो. शेतकरी ठिंबकच्या माध्यमातून शेतीसाठी पाण्याचा वापर करतात. परंतू, सरकारकडून त्या शेतकऱ्यांचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याचे सांगून पालकमंत्री यांनी या प्रश्नी लक्ष देण्याची गरज असल्याचे ते यावेळी म्हणाले.

आ. कैलास पाटील म्हणाले, शेतीसाठी ठिंबकचा वापर करावा, जिल्ह्यात कॅटीव्हेअरची संख्या मोठी आहे. त्यावर बॅरेजेस बांधल्यास जिल्ह्यात सिंचनात मोठी वाढ होणार आहे. तसेच शासनाकडून मराठवाड्यासाठी देण्यात येणाऱ्या ५४ टीएमसी पाण्यापैकी धाराशिव-बीड-लातूरचा हिस्सा किती हे निश्चित करुनच प्रकल्प आराखडा तयार करावा, असे मागणीही त्यांनी यावेळी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयकुमार थोरात यांनी तर सुत्रसंचालन संजय मैंदर्गी यांनी केले.

### पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे धाराशिव विमानतळ येथे आगमन व स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे आज धाराशिव विमानतळ येथे विमानाने आगमन झाले.

पालकमंत्री सरनाईक यांचे आगमन प्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी पुस्तक देऊन तर पोलीस अधीक्षक संजय जाधव व माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, एस.टी. चे विभाग नियंत्रक विनोद भालेराव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड यांची उपस्थिती होती.

### प्रतिकूल परिस्थितीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण पुष्पराज खोत यांचा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सटवाईवाडी येथील पुष्पराज नानासाहेब खोत यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास करून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्यांनी देशभरातून ३२१ वा क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सत्कार आज पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.



पालकमंत्री सरनाईक बोलतांना म्हणाले की, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशभरातून मोजकीच मुले यश मिळवतात.

अशा कठीण परीक्षेत ग्रामीण भागातील, प्रतिकूल परिस्थितीतील विद्यार्थ्यांचे यश अत्यंत प्रेरणादायी आहे. सरनाईक पुढे म्हणाले, हे यश फक्त पुष्पराज यांचे नाही, तर त्यांचे मार्गदर्शक शिक्षक, प्रोत्साहन देणारे पालक आणि नातेवाईक यांचेही आहे. त्यांच्या जिद्दीतून आणि परिश्रमातून अनेक तरुणांना प्रेरणा मिळेल.

शेवटी त्यांनी पुष्पराजला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत सांगितले की, यशाला शॉर्टकट नसतो. कष्ट आणि सातत्य हेच यशाचे खरे सूत्र आहे, असे ते म्हणाले. सत्कार समारंभाला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्यासह अन्य प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## नळदुर्ग शहरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० एप्रिल -**

नळदुर्ग येथे दि.३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील बसवश्रुष्टी गोलाई चौक, भवानी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, मल्लिकार्जुन मंदिर व नगरपालिका कार्यालय येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. बसवसृष्टी गोलाई चौकात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

दि.३० एप्रिल रोजी सर्वत्र महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती लिंगायत समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. नळदुर्ग शहरातही महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील गोलाई चौकात ज्या ठिकाणी भव्य, दिव्य अशी बसवश्रुष्टी उभारण्यात येणार आहे त्या नियोजित जागी महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याठिकाणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी माजी जि.प. सदस्य ॲड. दीपक आलुरे, वसंतराव वडगावे, महादेव पाटील, नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, भाजपचे शहर अध्यक्ष बसवराज धरणे, सुशांत भुमकर, संजय विठ्ठल जाधव, भाजपच्या तालुका अध्यक्षा रंजना विलास राठोड, माजी नगरसेवक दत्तात्रय कोरे, भाजपचे श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, बबन चौधरी, कैलास बोंगरगे, अक्षय भोई यांच्यासह ग्रामिण भागातील लिंगायत समाज बांधव उपस्थित होता.

शहरातील मुख्य भवानी चौकात महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. याठिकाणी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी भाजपचे शहर अध्यक्ष बसवराज धरणे, माजी नगरसेवक संजय बताले, दत्तात्रय कोरे, व्यापारी मंडळाचे सुभाष कोरे, दयानंद स्वामी, काशिनाथ कलशेट्टी, राजकुमार पिचे, मल्लिनाथ बाळुरकर, बसवेश्वर युवा मंचचे ओंकार शिरगुरे, धीरज शंकरशेट्टी, बंडप्पा कसेकर, अप्पु स्वामी, शिवय्या स्वामी, राजेंद्र स्वामी, वीरेंद्र बेडगे, सुरज मुळे, ओंकार कलशेट्टी, संकेत स्वामी, सुनिल कसेकर, संतोष बताले यांच्यासह लिंगायत समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होता.

## अतिक्रमण प्रकरणी पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मुख्याधिकाऱ्यांवर ताशेरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

शहरातील शासकीय सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस प्रशासनाने संरक्षण न दिल्यामुळे नगर प्रशासन हातबल झाले. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत मुख्य अधिकारी वसुधा फड यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. दरम्यान, यापूर्वी न.प.च्यावतीने अतिक्रम हटवून दि.५ एप्रिल २०२४ रोजी लोकशाही दिनामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना कळविले देखील होते. मात्र त्यानंतर संबंधित तक्रारदाराने दुर्लक्ष केल्याने पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण केले आहे.

शहरातील पाथरुड गल्लीतील सिटी सर्वे नंबर ८२७ च्या लगत शासकीय रस्त्यावर २००९-१० साली कमला यमपुरे यांनी पत्र्याचे शेड थाटून अतिक्रमण केलेले होते. याप्रकरणी सिटी सर्वे नंबर ८२७ चे मालक अ. जब्बार अ. शेख यांनी तक्रार दिली. तक्रारीच्या अनुषंगाने नगरपरिषद विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी शहर पोलीस ठाण्याच्या पोलिसांच्या संरक्षणात्मक बंदोबस्तात दि.५ एप्रिल २०२४ रोजी ते अतिक्रमण हटविले होते.

मात्र त्याच ठिकाणच्या सार्वजनिक रस्त्यावर दि. २० सप्टेंबर २०२४ ला गणपती बसवून पुन्हा अतिक्रमण केले. या दरम्यान देखील पोलिसांनी त्या गणपतीचे विसर्जन करून ते अतिक्रमण काढले. त्याच ठिकाणी छोटा गणपती बसवून अतिक्रमण करून तो रस्ता अडविला आहे. त्या बरोबरच याच रस्त्यावर पुढील बाजूस राजीव अलकुंटे, अंबऋषी यमपुरे व अंकुश यमपुरे यांनी देखील अतिक्रमण केलेले आहे. याबाबत जब्बास शेख, बाजीराव यमपुरे, सखुबाई यमपुरे व अंकुश यमपुरे यांनी न.प.चे मुख्याधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांकडे या संदर्भात तक्रार केली. त्या अनुषंगाने न.प. प्रशासनाने शहर पोलीस ठाण्यात पोलीस संरक्षण देण्याची मागणी दि.१६ डिसेंबर, दि.१४ जानेवारी, दि.११ फेब्रुवारी, दि.२३ एप्रिल व दि.२९ एप्रिल रोजी पत्राद्वारे केली.

पोलीस संरक्षण मिळत नसल्यामुळे नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी ते अतिक्रमण काढण्याची कारवाई अद्याप हाती घेतलेली नाही. जेव्हा पोलीस संरक्षण मिळेल तेव्हा ते अतिक्रमण काढण्याची कारवाई होऊ शकते असे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

## इटकळ येथे आय.एम. विनर परीक्षेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३० एप्रिल -**

ध्येय प्रकाशन अॅकॅडमी महाराष्ट्र संचलित आय.एम. विनर राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण सोहळा मौजे इटकळ येथे उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाला.



जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत इटकळ केंद्रातून इ. पहिली ते आठवीचे १६१ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये राज्य स्तरावर १, विभाग स्तरावर ४, जिल्हा स्तरावर १२ आणि तालुका व केंद्र स्तरावर ४२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले.

तसेच अणदूर बीटमधील ७ विद्यार्थी जवाहर नवोदय पात्र तर ५ विद्यार्थी एन.एम.एम.एस परीक्षेसाठी पात्र ठरले. एकूण ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच साहेबराव क्षीरसागर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अमोल गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी तात्यासाहेब माळी, शिक्षक नेते लालासाहेब मगर, अविनाश मोकशे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

ध्येय प्रकाशन अॅकॅडमीच्या वतीने आमदार प्रविण स्वामी यांना दीपस्तंभ पुरस्कार, तात्यासाहेब माळी यांना कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार व शिवदास भागवत यांना राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रजनीकांत तुपारे यांनी केले.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० एप्रिल -**

छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे यांनी महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून अभिवादन केले.

त्यांनी आपल्या मनोगतातून समाज सुधारक महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जात निर्मूलन, सामाजिक सुधारणा, साहित्य निर्मीती करून समाज परिवर्तनाचा विचार लोकांपर्यंत पोहचवला. अनुभव मंडपाची स्थापना करून लोकशाहीचा पाया घातला. त्याचबरोबर १९ व्या शतकातील आधुनिक संत तुकडोजी महाराज यांनी भजनावळी किर्तन प्रवचन या माध्यमातून सम



ाज प्रबोधनाचा विचार लोकांमध्ये रुजवला. ग्रामगीता हा ग्रंथ लिहून सामाजिक रचनेचा पाया घातला, असे मत डॉ. मांजरे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजन समिती प्रमुख प्रा.डॉ. सुरेश शिंदे यांनी केले तर आभार प्रा.डॉ. डी.बी. मुळे यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### उदगीर रोटरीच्या वतीने शाळकरी मुलांसाठी उद्योजकता शिबिर संपन्न

**उदगीर, दि.३० एप्रिल -**

येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने तालुक्यातील मादलापुर शिवारातील ग्लो फूड्स या कारखान्यास शहरातील माऊंट लिटरा झी स्कुलच्या १५० विद्यार्थ्यांना घेवून जावून भेट घडवून आणली. यावेळी माऊंट लिटरा झी स्कुलच्या इंटरॅक्ट क्लबचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते. या भेटीतंर्गत ग्लो फूड्सचे मालक शुभम जाधव यांनी त्यांच्या कारखान्यात तयार होणाऱ्या चॉकलेट, जाम, सॉस, लोणचे आदी वस्तूंच्या प्रक्रियेबद्दल सविस्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उदगीर रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, सचिव ज्योती चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन विद्या पांढरे, संतोष फुलारी, अभिजित पटवारी, प्राचार्य सुर्यकांत चवळे, उपप्राचार्य कल्पना चौधरी, आदर्श गुप्ता, सचिन घोळवे, अनिल बालूरकर, रिझवाना काझी, अंजना जगदाळे आदी शिक्षक उपस्थित होते.



### श्री रामराव पाटील विद्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**दैठणा, दि.३० एप्रिल -**

रामराव पाटील विद्यालय दैठणा येथे महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे विधिवत पद्धतीने पूजन करून यांना वंदन करण्यात आले. याप्रसंगी रामराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठलराव कदम यांच्याकडून महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावरती अतिशय मोजक्या शब्दात पण अर्थपूर्ण असे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक कारभारी यांच्याकडून हे काम पाहण्यात आले. याचप्रमाणे राजीव गुडे, गोविंद पेंटमशेटे या सर्वांकडून उपस्थिती लावण्यात आली.



### शिरूर अनंतपाळ शहरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवात साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.३० एप्रिल -**

शिरूर अनंतपाळ शहरात समता नायक, जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे रात्री १२ वाजता विविध प्रकारच्या आवाजांची अतिषबाजी करून आनंद साजरा करण्यात आला. तसेच सकाळी १० वाजता बसवेश्वर चौक येथे महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आरती करून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ९५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी लातूर जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष ॲड. जयश्री पाटील, धोंडिराम सांगवे, गणेश धुमाळे, महादेव आवाळे, ओमप्रकाश गलबले, विठ्ठल दराडे, उमाकांत देवंगरे, संतोष शेटे, शंकर बेंबळगे, ॲड. गणेश सलगरे, विनोद धुमाळे, रत्नाकर सुगावे, सोमेश्वर तोंडारे, शिवणे तसेच शहरातील सर्व धार्मिय नागरिक उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वरांनी जगातल्या पहिल्या लोकसंसदेची सुरुवात केली : आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० एप्रिल -**

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात जातिव्यवस्थे बरोबर अंधश्रद्धा इतर वाईट गोष्टींविरुद्ध संघर्ष केला. स्त्री-पुरुष समानता, उच्च-नीच भेदभाव नष्ट करण्यासाठी लढा उभारला. अनुभव मंटपाच्या माध्यमातून पहिल्या लोकसंसदेची बिजे रोवली. समाजात समतेचा विचार रुजविला म्हणून जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आपण सर्वांनी जीवनाची वाटचाल करावी असे मत माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील नगर परिषदेसम ोरील प्रांगणात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त बसव ध्वजारोहण व अभिवादन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी मा.आ. मनोहर पटवारी, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, सिद्धेश्वर पाटील, बसवराज बागबंदे, राहुल केंद्रे, उषा कांबळे, प्रमोद शेटकार, सभापती प्रीती भोसले, सिद्धेश्वर पाटील, सुभाष धनुरे, प्रा. म ल्लेश झुंगास्वामी, बाबुराव पांढरे, उत्तरा कलबुर्गे, सय्यद जानीमियाँ, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, मनोज पुदाले, अम ोल अनकल्ले, गणेश गायकवाड, सुभाष धनुरे, उध्दव महाराज हैबतपुरे, कुणाल बागबंदे, ॲड. महेश मळगे, साईनाथ चिमेगावे, अमोल निडवदे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, नवनाथ गायकवाड, मधुमती कनशेट्टे, उर्मिला वाघमारे, अनिता बिरादार, शांतवीर मुळे, समीर शेख, कुणाल बागबंदे, मंदाकिनी जिवणे, हुस्ना बानो, अनिता बिरादार, शशिकला पाटील, बालाजी गवारे, पप्पु गायकवाड, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, व्यंकट बोईनवाड, नरसिंग शिंदे, श्रीकांत पाटील, रुपेंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. संजय बनसोडे जात, सामाजिक स्थिती या गोष्टींचा विचार न करता सर्व लोकांना समान संधी देत जिवनात



परिवर्तन घडुन आणले .अनुभव मंटपात सर्व जातीधर्मातील शरण सहभागी होते.

त्याचे वचन साहित्याच्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम केले. काम हेच ईश्वर मानुन श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. मागील काळात जळकोट येथे जगतज्योती म.बसवेश्वरांचा पुर्णाकृती पुतळा उभारला, उदगीर व जळकोट येथे लिंगायत भवनची निर्मिती केली. भविष्यात ही समाजातील सर्व प्रश्न सोडवणार असुन येत्या काळात समाजाच्या मागणीचा विचार करुन बसव भवन उभारणार असल्याचेही आ.बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व समाजातील प्रतिष्ठित नागरीक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने उध्दव दुवे यांच्या कवितेला राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिक

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३० एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त म हाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जालना यांच्या वतीने आयोजित जिल्हा प्रेरणा मेळावा व राज्यस्तरीय काव्य स्पर्धा पारितोषिक आणि पुरस्कार वितरण सोहळा अजंता बुद्ध विहार, रेवगांव रोड, आनंद नगर जालना येथे संपन्न झाला. या स्पर्धेत आंबेवाडी (ता. चाकूर, जिल्हा लातूर) येथील कवी उध्दव दुवे यांच्या 'सांग तुला बाबासाहेब कळलेत का?' या कवितेला द्वितीय पारितोषिक मिळाले.

महा अंनिस जालना जिल्हाध्यक्षा वैशाली सरदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे, साहित्यिक डॉ. बस्वराज



कोरे हे उद्घाटक म्हणून तर स्पर्धा परीक्षक म्हणून श्रीकांत गायकवाड उपस्थित होते.

बासरी वादक योगेश पवार यांनी बासरीवर आलाप राग गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य काव्य स्पर्धेचे आयोजन व अंनिस मार्फत सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल पाच जणांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातून स्पर्धेसाठी एकूण ४७ कविता मराठीसह काही हिंदी भाषेतील सहभागी झाल्या होत्या. कविता मूल्यमापनासाठी कवितेचे स्वरूप, कवितेची भाषा, विषय, लयबद्धता, प्रतिमांचा वापर, एकंदरीत प्रभाव, इत्यादी बाबींचे गुणात्मक मूल्यमापन करून जास्तीत जास्त अचूक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला. यात प्रथम प्रा.डॉ. मारोती कसाब कविता तुझाच आधार वाटे बाबा (लातूर), तर द्वितीय उद्धव दुवे कविता सांग तुला बाबासाहेब कळलेत का? (लातूर), तृतीय राहुल हिवराडे कविता हे विश्वरत्ना (नागपूर) तर उत्तेजनार्थ विजय शेळके यांची रचना जगण्याची धुसर व्याख्या (छ.संभाजी नगर), मोहन गोडसे रचना माणूसपणाचं तत्व पाळत रहा (जालना), संबोधी संदीप गवई यांची रचना बाबासाहेबांमुळे (बुलढाणा), परीक्षक म्हणून जालना येथील कवी तथा कथाकार प्रा. श्रीकांत गायकवाड, महा. अंनिस मार्फत विविध सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यात प्रा.डॉ. बसवराज कोरे (जालना), प्रा.डॉ. कमलेश खिल्लारे (बुलढाणा), शिवाजी गाढेकर (अंबड), ज्ञानेश्वर उढाण(घनसावंगी) कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजू खिलारे जिल्हा कार्याध्यक्ष, दिलीप शिखरे जिल्हा प्रधान सचिव, किशोर भालेराव अध्यक्ष महाराष्ट्र अंनिस संस्कृतीक विभाग आणि त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

## अहमदपूरमध्ये विविध ठिकाणी म. बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३० एप्रिल -**

समता नाईक महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त आज शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे ध्वजारोहण करून साजरी करण्यात आली. यावेळी नियोजित बसवेश्वर पुतळ्याच्या ठिकाणी म. बसवेश्वराच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अक्षय तृतीयानिमित्त समता नायक महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर चौक येथे राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी श्री १०८ राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी महाराज, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, बसवेश्वर पुतळा समितीचे अध्यक्ष शाम महाजन, राष्ट्रवादीचे सरचिटणीस शिवानंद हिंगणे, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष कल्याणकर, मुख्याधिकारी संतोष लोमटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भारत चामे, शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, अश्विनी कासनाळे, पांडू मिरकले, शिवराज पाटील, शिवाजीराव देशमुख, चंद्रकांत मध्ये, प्रताप पाटील यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते. सहा महिन्यात पुतळा उभारणार जग ज्योती महात्मा बसवेश्वर पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून शासकीय निधी प्राप्त होताच सदर पुतळा सहा महिन्याच्या आत स्थान आपण होणार असल्याचे पुतळा समितीचे सचिव सांब महाजन यांनी सांगितले.

शासकीय कार्यालयात, जयंती उत्साहात, शहरातील उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, शहरातील अनेक शाळेम ध्ये सुद्धा महात्मा बसवेश्वरांची जयंती साजरी करण्यात आली.

## निलंगा येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३० एप्रिल -**

निलंगा शहरात समतानायक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती प्रतिमा पूजन, ध्वजारोहण, मोटारसायकल रॅली यासह विविध उपक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली.

सकाळी ८ वा. महात्मा बसवेश्वर वाचनालय, बसव सृष्टी निलंगा येथे माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व षटस्थल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री तेरणी पाटील, लातूर जिल्हा मजूर संस्थेचे संचालक शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख विनोद आर्य, शिवाजी रेशमे गुरुजी, रवी फुलारी, बाळासाहेब शिंगाडे, मनोज कोळ्ळे, संगन बसव स्वामी विरक्त मठाचे अध्यक्ष अमोल आर्य, बसव जयंती उत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष सोमनाथ आग्रे, राजकुमार चिकराळे, एम.के. कस्तुरे, युवराज बिराजदार, प्रकाश शेटकार, शंकर भुरके, प्रशांत सोरडे, वीरभद्र आग्रे, श्रीशैल बिराजदार, बुद्धिवंत मुळे, डॉ. विक्रम कुडुंबले, राजकुमार निला, शिवप्रसाद मुळे, रत्नेश्वर गताटे, नवनाथ कुडुंबले, शिवकुमार रुकारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार संभाजीराव पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मोटरसायकल रॅलीचे शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी बसव प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

✻ दैठणा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इम ारतीच्या बांधकामासाठी दैठणा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या महिला संचालक व कारसेवक यांच्या हस्ते महेश देवबाप्पा यांच्याकडून अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावरती विधिवत पूजा करण्यात आले.

## वलांडी येथे महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.३० एप्रिल -**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. शिवाजी चौक येथे म हात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी वक्त्यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा गौरव करत समाजातील विविध घटकाबदल महात्मा बस्वेश्वरांनी केलेले कार्य याचा उल्लेख केला.

अंकिता सोमनाथ बिरादार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बसवेश्वरांनी स्त्रियांसाठी म हत्त्वपूर्ण कार्य केले.

त्यांनी महिलांना समाजात स्थान मिळवून दिले. आजच्या काळात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात, असे सांगितले.

यावेळी संगमेश्वर बिरादार महाराज, उमाकांत नागलगावे, राम भंडारे, नागेश बदनाळे, रवि स्वामी, भालचंद्र भंडारे, मधुकर पाटील, बाळासाहेब उमाटे, माधव उमाटे, बंटु बदनाळे, ब्रम्हानंद रट्टकले, माधप्पा स्वामी, राजकुम ार गंगापुरे, अरुण पाटील, धनाजी पाटील, अंकुश सुर्यवंशी, सोम नाथ बिरादार, सतिश नागलगावे, विलास बिरादार, संगमेश्वर स्वामी, विशाल फुलारी, जयदेवी रट्टकले, मंगलताई कणजे यांच्यासह नागरीक उपस्थीत होते.

## बेलकुंडच्या सुपुत्राची पोलिस सन्मानचिन्हासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३० एप्रिल -**



अंत्यंत प्रतिकुल परिस्थितीचा सामना करून पोलीस दलात भरती झालेले औसा तालुक्यातील बेलकुंडचे सुपुत्र सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग व्यंकट माने यांना महाराष्ट्र पोलीस दलात गडचिरोली, धाराशिव येथे केलेल्या उत्कृष्ट काम गिरीबद्दल पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह (मेडल) जाहीर झाले आहे. सध्या नांदेड जिल्ह्यातील सोनखेड पोलीस स्टेशनचे प्रभारी म्हणून काम पाहत आहेत.

एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले पांडुरंग माने सोलापूर राज्य राखीव पोलीस दलात पोलीस शिपाई पदावर भरती झाले होते.

नौकरी करीत एम पीएससी परिक्षा उतीर्ण झाल्यानंतर पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली.

## म. बसवेश्वर जयंतीनिमित्त सर्वरोग निदान व रक्तदान शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० एप्रिल -**

येथील वीरशैव समाज व श्री हावगीस्वामी युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी श्री हावगीस्वामी मठ संस्थान येथे सर्वरोग निदान व रक्तदान शिबीर घेण्यात आले.

शिबीराचे उद्घाटन श्री गुरू हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रमोद शेटकार, वीरशैव समाजाचे कोषाध्यक्ष सुभाष धनुरे, भाजपाचे शहराध्यक्ष अमोल अनकल्ले, अमोल निडवदे, विजय निटुरे, आशिष आंबरखाने, कल्याण कपाळे, मनोज पुदाले, उत्तरा कलबुर्गे, राजकुमार हुडगे, प्रभुराज कप्पिकेरे, बाबुराव पांढरे, ॲड. महेश मळगे, राम मोतीपवळे, रविंद्र हसरगुंडे, मनोहर लोहारे, सुनील हावा, संगम पटवारी, गुंडू समगे, मंदाकिनी जीवने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी श्री हावगीस्वामी युवक मंडळाच्या वतीने सिंहासनाधिष्ठ म. बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे अनावरण डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते



करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रतीक्षा लोहकरे यांनी केले. यावेळी सम ाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या एक दिवसीय आरोग्य शिबीरातंर्गत विविध आरोग्य विषयक सर्व रोगनिदान व आयुर्वेदिक चिकित्सेच्या व नेत्र तपासण्या या सोबतच बालकांचे, स्त्रियांचे (श्वेतपदर व रक्तपदर) इत्यादी विविध आजारांवर शहरातील विविध हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी आपली सेवा दिली.

यावेळी अंबरखाने ब्लड बँकेने रक्तसंकलन केले. एकुण २१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. श्री. वरदविश्व आयुर्वेदीक हॉस्पीटल व पंचकर्म केंद्र लातूर यांच्या तर्फे माणदुखी, पोटदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, संधीवात, वाताचे अशा एकुण १२७ जणांची तपासणी करून मोफत औषधोपचार व सल्ला देण्यात आले. त्याचबरोबर उदगीर लॅब असोसिएशन, उदयगिरी लॉयन्स धम ार्दाय नेत्र रुणालय यांच्या मार्फत ६० नेत्र तपासण्या व त्यातून २३ ऑपरेशन करण्यात आले. त्याचबरोबर शिबीरात १७ हृदय तपासण्या, १२ ईसीजी, ८ बालरोग तपासणी, ७२ स्त्रीरोग तपासणी श्रीदत्त हॉस्पिटल लातूर यांच्या मार्फत करण्यात आले.

हे सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी संगम समगे, संदीप उप्परबावडे, अजय कबाडे, सचिन काराम ुंगे, आकाश समगे, सुमीत हाडोळे आदिंनी परिश्रम घेतले.

